● पंढरपूर ● मंगळवार, १९ नोव्हेंबर २०२४
● किंमत ₹ ४ ● पाने : ८

# पंढरी संचार

NO PAIDNEWS NEWSPAPER

pandharisanchar.com RNI-MAH-MAR/1499/2000 ● वर्ष २९ ● अंक - १७९






# भालके यांना विजयासाठी ग्रह अनुकूल !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर /पुणे :** पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघांमध्ये समाधान आवताडे आणि भगीरथ भालके यांच्यातील प्रचंड चुरशीची लढत पाहायला मिळत आहे. या लढतीच्या विजयाला अनेक कंगोरे असले तरी ग्रहस्थितीवरून भालके आणि आवताडे यांच्या राशी व लग्न कुंडलीच्या तुलनात्मक अभ्यास केला असता त्यामध्ये भगीरथ भालके यांचे राजयोग अधिक प्रखर असल्याचे दिसून येते .

**समाधान आवताडे**

समाधान आवताडे यांचा जन्म 21 नोव्हेंबर 1976 रोजी रहाटेवाडी तालुका मंगळवेढा येथे सकाळी सात वाजता झाला . यांचे वृश्चिक लग्न असून रास तुळ आहे त्यांना सध्या केतूची महादशा चालू आहे . त्यात गुरुची अंतर्दशा आहे. तसे पाहिले तर सध्या राहू आणि केतू नीच राशीत असून समाधान आवताडे यांना राहू सहावा हा ठीक आहे पण बारावा केतू आहे . त्यामुळे खर्च , नुकसान , पराभव याची लक्षणे दिसतात. दुसरे म्हणजे , सध्या कुंभ राशीत शनी असून 3 ऑक्टोबर 2024 ते 27 डिसेंबर 2024 पर्यंत शनि हा शततारका नक्षत्रात आहे. ते घात नक्षत्र आहे त्यामुळे त्यांना ते अडचणीचे ठरणारे आहे.


तिसरी स्थिती म्हणजे सध्या त्यांचा गुरु ८ वा आहे , त्यामुळे त्यांना गुरु गुरुबळ फारसे नाही .


16 नोव्हेंबर चा रवी मात्र वृश्चिकेत जाणारा असल्यामुळे तो चांगला आणि फलदायी आहे . त्यामुळे त्यांना चांगली मते मिळतील , पण दोन्ही पत्रिकांची तुलना करता ही स्थिती अंतिम विजयासाठी हे पुरेशी नाही.

**भगीरथ भालके**

भगीरथ भालके यांचा जन्म 9 एप्रिल 1987 रोजी दुपारी दोन वाजून पंधरा मिनिटांनी सांगोला येथे झाला . त्यानुसार त्यांची लग्न आणि जन्म कुंडली चा अभ्यास करता , राहू केतू नीच राशीत असून केतू हा तिसऱ्या आणि राहू नवव्या स्थानावर आहे . म्हणजे ही स्थाने भाग्य आणि पराक्रमाची लक्षणे सांगतात .

दुसरे म्हणजे , भालके यांची कर्क लग्न , कर्क रास असून सध्या त्यांना गुरुबळ चांगले आहे . गुरु अकरावा आहे.




तिसरी स्थिती , 16 नोव्हेंबर रोजी वृश्चिकेत जाणारा रवी त्यांना चांगला आहे. कर्क राशीमध्ये सध्या मंगळाचं भ्रमण चांगल आहे. 20 नोव्हेंबर या मतदानाच्या दिवशी चंद्र मंगळ युती आहे. शिवाय त्यांना सध्या चंद्राची महादशा चालू आहे.

चंद्राच्या महादशेमध्ये गुरुची अंतर्दशा चालू आहे , त्यामुळे ही स्थिती त्यांच्या करिता विजयासाठी अनुकूल असल्याचे ज्योतिष तज्ज्ञ मानतात .

फल ज्योतिष शास्त्र मानावे किंवा नाही याबाबत अनेक मतप्रवाह आहेत. परंतु समाजातील एक मोठा वर्ग फल ज्योतिष मानतो . जन्म स्थिती वेळी ग्रह , तारे , नक्षत्र आणि चालू ग्रहमान यावरून मूळ कुंडलीचा अभ्यास करून ज्येष्ठ ज्योतिष विशारद आणि ज्योतिष तज्ज्ञांच्या माध्यमातून हे विश्लेषण केले आहे . हे आमचे वैयक्तिक मत नाही.

## पंढरी संचारचे विश्लेषण आणि इतिहास

### प्रशांत परिचारक आणि सुधाकर परिचारकांचीच उमेदवारी फलदायी

**25% मतांनी होईल भालके होईल सरशी**

**पंढरपूर :** २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीतील मतदानासाठी दोन दिवस उरले असताना सुधाकरपंत परिचारक आणि भारत भालके यांच्या गृहस्थितीवरून तरी भारत भालके ही किमान 25 टक्के अधिक मते घेऊन विजयी होतील असा अंदाज आहे. प्रशांत परिचारक यांच्यापेक्षा सुधाकर पंत परिचारक यांचे उमेदवारी योग्य ठरली असाही अंदाज प्रशांत परिचारक आणि सुधाकरपंत यांच्या तुलनात्मक कुंडली वरून दिसतो. तथापि भारत भालके यांचा मंगळ अधिक फलदायी असल्यामुळे आणि तो राजयोग कारक असल्यामुळे ते किमान 25 ते 30 टक्के मध्ये अधिक घेतील.

**२०१९** च्या निवडणुकीमध्ये तत्कालीन आमदार भारत भालके यांचा निर्णायक मताधिक्याने विजय होईल असे फलज्योतिष विश्लेषण पंढरी संचार मध्ये वर्तवले होते . तो भविष्य संकेत खरा ठरला.

### समाधान आवताडे यांचा अल्पशा मताने होणार विजय



**२०२१** मध्ये पोटनिवडणुकीत , भालके यांच्या दुःखद निधनानंतर मोठी सहानभूती होती , त्यामुळे भगीरथ भालके यांचा विजय होईल हे निश्चित मानले जात होते परंतु पंढरी संचार ने फलज्योतिष विश्लेषणाच्या माध्यमातून समाधान आवताडे यांचा थोडक्यात तीन ते पाच हजार मताने विजय होईल , असे भविष्य वर्तविले

### तीस हजाराच्या पुढील मताधिक्याने प्रणिती ताईंच होणार विजय ; अनुकूल गुरु दाखवणार कमाल



**२०२४** च्या लोकसभा निवडणुकीत प्रणिती शिंदे यांचे ग्रह प्राबल्य पाहता त्या किमान 30,000 च्या पुढे मताधिक्य घेऊन विजयी होतील असे भविष्य वर्तविले होते , ते तंतोतंत खरे ठरले.

संग्रहित पंढरी संचार

# दिलीप धोत्रे यांच्या प्रचार फेरीस चांगला प्रतिसाद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील मनसेचे उमेदवार दिलीप धोत्रे यांनी आज सोमवारी पंढरपूर शहरात प्रचार फेरी काढली .यास मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचे दिसून आले . मनसे उमेदवार दिलीप धोत्रे यांनी सोमवारी सकाळी 11 वाजता पंढरपूर शहरातून प्रचार फेरी काढली.यावेळी त्यांच्याबरोबर मनसेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. ठिक ठिकाणी दिलीप धोत्रे यांचे मतदारांनी स्वागत केले.



धोत्रे यांनी मतदारांना मतदान करून विजयी करावे असे आवाहन केले. पंढरपूर शहरात दिलीप धोत्रे यांनी अनेक कामे केली आहेत. गोरगरिबांना मदत केली आहे. यामुळे धोत्रे यांना मानणारा मोठा गट निर्माण झाला आहे. यामुळे मतदारांच्या आशीर्वादामुळे आपण विजयी होऊ असा विश्वास दिलीप धोत्रे यांनी पत्रकारांची बोलताना व्यक्त केला. गेल्या पंधरा दिवसापासून पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात दिलीप धोत्रे प्रचार करीत आहेत. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी आज सोमवारी त्यांनी पंढरपूर शहरात विविध ठिकाणी जाऊन प्रचार फेरी काढून मतदारांचे

# निवडणूक अधिकाऱ्यांची गस्त तर नेते मंडळी चिंतेत व्यस्त !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर-मंगळवेढा विधानसभेच्या निवडणुकीची प्रचार सांगता झाली असली तरी सर्वच पक्षाची पुढची गुप्त यंत्रणा कशा पद्धतीने राबवायची याचे प्रात्यक्षिक पंढरपूर शहरातील अनेक भागात आणि ग्रामीण भागातील कांही गावांत दिसून येत असल्याची चर्चा नागरिकांत होताना दिसते.



विधानसभा निवडणुक २०२४

नाशिक येथे सुमारे पाच कोटी रुपयाचे घबाड एका प्रसिद्ध हॉटेलमध्ये सापडल्याने महाराष्ट्रातील सर्वच उमेदवारांची गुप्त यंत्रणा सावधानतेने पाऊल टाकत असल्याचे दिसून येत आहे. विशेषतः पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघातील खिरापत वाटण्याचे काम अत्यंत काळजीपूर्वकरित्या करण्यात यावे अशी सूचना कार्यकर्त्यांना दिली असल्याचे नंबर २ च्या फळीतील तिन्हीही पक्षाच्या नेत्यांकडून चर्चिले जात आहे. येणारे ४८ तास अत्यंत महत्वाचे असल्याने निवडणूक आयोगाचे » पान ३ वर

**» At a Glance**

## ग्रामीण जिल्ह्यात मनाई आदेश लागू



**सोलापूर :** सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून दि. 17 नोव्हेंबर 2024 सकाळी 8 वा. पासुन ते 1 डिसेंबर 2024 रात्री 8 वा. पर्यंत या कालावधीत मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत, असे अपर जिल्हादंडाधिकारी मनिषा कुंभार यांनी कळविले आहे. या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेण्यास मनाई करण्यात येत आहे.

# जरांगेंच्या एसआयटी चौकशीला बाके वाजवणारा आमदार हटवा

## मराठा समाजातून प्रक्षुब्ध प्रतिक्रिया

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मंगळवेढा :** महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये मराठा आंदोलन करते मनोज जरांगे पाटील यांच्याविरुद्ध एसआयटी चौकशीची घोषणा झाली. त्यावेळी अनेक आमदारांनी बाकी वाजवली. यामध्ये समाधान आवताडे हे देखील होते. समाजाच्या विरुद्ध काम करणाऱ्या अशा आमदाराला हटवा असे प्रतिक्रिया काल अनेकांनी सोशल मीडियावर व्यक्त केली. समाधान आवताडे आणि प्रशांत परिचारक यांच्या पंढपुरातील कॉर्नर सभांच्या लाईव्ह स्ट्रीमिंग खाली या प्रतिक्रिया येत होत्या. अवताडे यांनी कधीच मराठा समाजाला सन्मानाची वागणूक दिली नाही, जरांगे विरोधात बाके वाजवणारा आमदार आला घरी पाठवा, आमचा सन्मान भाजपाच्या दारी गहाण ठेवणारा लोकप्रतिनिधी नको.... अशा प्रतिक्रिया नेटीजन्स टाकत होते. काल सायंकाळी परिचारक-अवताडे यांनी तीन कॉर्नर सभा घेतल्या. यावेळी काही चॅनल्सने त्याचे थेट प्रक्षेपण केले होते.

त्या प्रक्षेपणाच्या खाली youtube चॅनलच्या कॉमेंट्स वर अनेकांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. काहींनी अवताडे यांचे कौतुक केले तर काहीं प्रशांत परिचारक हेच आमचे नेते असेही व्यक्त झाले. तर अनेकांनी 999 असे टाईप करून भालके यांचा ट्रेंड चालवण्याचा प्रयत्न केला. परंतु अनेकांनी अवताडे यांनी सातत्याने मराठा समाजाविरुद्ध घेतलेल्या भूमिकेचा यावेळी समाचार घेतला.

# मोहोळचा लढा निर्णायक वळणावर : संजय अण्णांनी दिला खरेंना पाठिंबा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मोहोळ :** आमदार यशवंत माने आणि राजन पाटील यांच्या विरोधात असलेल्या सर्व शक्तींचे एकीकरण करण्याचा आज अखेरचा टप्पा मोहोळ येथे पार पडला वर्षानुवर्षी पाटील यांच्या सत्तेशी लढणारे संजय अण्णा खीरसागर यांनी आज राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार राजू खरे यांना पाठिंबा देत त्यांची शक्ती वाढवली. संजय अण्णा क्षीरसागर यांनी मोहोळ मतदारसंघात अनेक निवडणुका लढवल्या आहेत त्यांच्या पाठीमागे त्यांच्या समाजासह कट्टर शिवसैनिकांचा आणि एक स्वतंत्र गट कार्यरत आहे. एका प्रदीर्घराजकीयप्रवासामध्येत्यांनीराजनपाटीलयांच्याविरोधातयेथेगटजिवंत ठेवला. आज ते आपल्या संपूर्ण गटानिशी राजू खरे यांच्या पाठीमागे उभे राहिले. त्यामुळे खरे यांचे ताकद वाढली असून येथील लढाई आता निर्णायक टप्प्यावर आली आहे.




## दुहेरी सरकार , मोदी आणि स्थानिक विकासाचे मुद्दे

# अवताडे व परिचारक यांची प्रचार फेरी ; चौका चौकात स्वागत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील महायुती भाजपचे उमेदवार आमदार समाधान आवताडे यांच्या प्रचारार्थ आज सोमवारी पंढरपूर शहरात प्रचार फेरी काढण्यात आली या फेरीत उमेदवार आमदार समाधान अवताडे माजी आमदार प्रशांत परिचारक पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते प्रचार फेरी चौका चौकात येतात आमदार अवताडे व परिचारक यांचे स्वागत फटाके वाजवून व हार घालून करण्यात आले विठ्ठल मंदिर येथील संत नामदेव पायरी चे दर्शन घेऊन पदयात्रा सुरू करण्यात आली ही पदयात्रा महाद्वार कालिकादेवी चौक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नगर संत पेठ काळा मारुती छत्रपती शिवाजी महाराज चौक नवी पेठ प्रदर्शना मार्ग अधिक मार्गावरून काढण्यात आली यावेळी आमदार अवताडे यांनी मतदारांना मतदान रुपी आशीर्वाद द्यावे असे आवाहन केले.

**पंढरपूर :** आज ब्राम्हण महासंघ पंढरपूर यांच्या सदस्य व सभासदांची बैठक सौ प्रणिती दामोदरे (भक्ती उत्पात )यांच्या निवासस्थानी पार पडली यावेळी ब्राम्हण ज्ञाती बांधव उपस्थित होते.. ब्राह्मण संघटन,युवक संघटन बांधणी, आगामी पंढरपूर प्राधिकरण साधक -बाधक परिणाम,सहल नियोजन आणि उमेद अंतर्गत तरुणांचे संघटन यावर चर्चा कृती आढावा घेण्यात आला.युवक संघटन 80 टक्के कार्य पूर्णत्वास गेले असून लवकरच युवक महोत्सव कार्यक्रम आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती तालुका अध्यक्ष चैतन्य केसकर यांनी दिली.यावेळी चालू मतदार संघातील विद्यमान आमदार समाधान अवताडे यांना पाठिंबा देण्याचे सर्वानुमते ठरले.आगामी काळात संघटनात



तरुणांची संख्या विस्तार व उद्योगाबाबत ध्येय धोरणे याबाबत जिल्हा संघटक अमोल कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.सहली व व्यवस्थापन अमृता कुलकर्णी यांनी माहिती दिली.तालुका उपाध्यक्ष चळे येथील पिंटू कुलकर्णी, सचिव पदी मनोज राजगुरू तर संपर्कप्रमुख पदी ओंकार कुलकर्णी त.शेटफळ यांची नियुक्ती करण्यात आली. आभार जिल्हा महिला संघटक अमृता बडवे यांनी मानले. यावेळी जेष्ठ अशोक कुलकर्णी प्रदीप कुलकर्णी आदी सह बांधव उपस्थित होते.

पंढरी संचार


**सोलापूर :** सोलापूर दक्षिण विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांच्या प्रचारार्थ नवदुर्गा देवस्थान, निलम नगर भाग 2 येथे कॉर्नर सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी धर्मराज काडादी यांनी दक्षिण सोलापूरच्या विकासासाठी मतदारांनी आपल्याला साथ द्यावी असे आवाहन केले. या सभेला ॲड. मिलिंद थोबडे, सिद्धाराम चाकोते, प्रा. अशोक निंबर्गी आदींची उपस्थिती होती.

## खा.प्रणिती शिंदे यांची भाजपावर खरमरीत टिका

# संघर्ष योद्धा भगीरथ दादा यांना विजयी करा : खा. शिंदे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात कै. आ. भारत नाना भालके यांनी चांगले काम केले आहे. यामुळे नानांना मानणारा मोठा वर्ग या मतदार संघात आहे. नानाप्रमाणे भगीरथ भालके नागरिकांसाठी काम करणार आहेत. यामुळे या निवडणुकीत मतदारांनी भगीरथ भालके यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहून त्यांना विजयी करावे असे आवाहन खासदार प्रणिती शिंदे यांनी केले.



पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडी मधील काँग्रेसचे उमेदवार भगीरथ भालके यांच्या प्रचारार्थ पंढरपुरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत खासदार शिंदे बोलत होत्या. यावेळी उल्हास पवार, उमेदवार भगीरथ भालके, पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी खासदार शिंदे म्हणाल्या, लोकसभा निवडणुकीत मतदारांनी मला साथ दिली. यामुळे मोठ्या मताने मी विजयी झाले. त्याचप्रमाणे आता विधानसभा निवडणुकीत भगीरथ भालके यांच्या पाठीमागे उभे राहावे. लोकसभा निवडणुकीत भाजपने साम, दाम, दंड, भेद, अर्थ याचा वापर केला. मात्र मतदारांनी कशालाही भिक न घालता निर्भयपणे मतदान केले. यामुळे माझा विजय झाला आहे. पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात गेल्या तीन वर्षात म्हणावा तसा विकास झाला नाही. यामुळे मतदारांची कामे करण्यासाठी भगीरथ भालके निवडणूक रिंगणात उभे आहेत. मतदारांनी त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहून मतदान करून विजयी करावे असे आवाहन खा. शिंदे यांनी केले.

### अभेद्य विठ्ठल परिवाराचे दर्शन

मंदिर परिसरात झालेल्या या सभेमध्ये भगीरथ भालके यांच्या समर्थनार्थ समाधान काळे, युवराज पाटील, गणेश पाटील या सर्व विठ्ठल परिवाराच्या शिलेदारांनी एकीचे दर्शन दिले.

काँग्रेसने लोकांसाठी काम केले आहे. मात्र भाजप स्वतःसाठी काम करत असल्याचे दिसून येत आहे. भाजप हे उद्योगपती धार्जिनी आहे. त्यांना अदानी, अंबानी जवळचे वाटतात. मात्र शेतकऱ्यांसाठी भाजप काही करू शकत नाही. उलट खते, बियाणे, कीटकनाशके यांच्या दरात वाढ करण्यात आली आहे. यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. या निवडणुकीत पुढारी नेते एका बाजूला तर मतदार दुसऱ्या बाजूला आहेत. यामुळे ही निवडणूक अटीतटीची होणार असून यात भालके विजयी होणार यात शंका नाही असे सांगून खासदार शिंदे म्हणाल्या, महाराष्ट्रातील नागरिक स्वाभिमानी आहे. भाजप पैशाने सर्व विकत घेण्यास तयार आहे. मात्र स्वाभिमान विकत घेता येत नाही. हे अनेक मतदार संघात लोकांनी दाखवून दिलेले आहे. यामुळे यंदाच्या निवडणुकीत मतदारांनी भगीरथ भालके यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहून मतदान करून विजयी करावे असे आवाहन केले आहे. लोकसभा निवडणुकीत मतदारांनी माझ्यावर प्रेम दाखवून भरघोस मतांनी विजयी केले. त्याचप्रमाणे विधानसभा निवडणुकीत भगीरथ भालके यांच्यावर प्रेम करून विजयी करावे. भालके विजयी होतात. त्यांना मंत्रिमंडळात मंत्री करण्यात येईल असे आश्वासन खासदार शिंदे यांनी दिले.

यावेळी बोलताना उमेदवार भगीरथ भालके म्हणाले, नागरिकांच्या आशीर्वादामुळे तीन वेळा कै. आ. भारतनाना भालके विजयी झाले आहेत. 2009 च्या विधानसभा निवडणुकीत नेते एका बाजूला व मतदार दुसऱ्या बाजूला होते. या निवडणुकीत मतदारांचा विजय झाला असून मतदारांनी भालके यांना विजयी केले होते. यानंतर नानांनी पंढरपूर व मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील गोरगरीब नागरिकांसाठी काम केले आहे. विठ्ठल मंदिर परिसरात छोटे व्यावसायिक बसले असताना त्यांना पोलिसांनी त्रास दिला. तेव्हा नाना धावून गेले. त्यांनी प्रशासनाला सांगितले. गरिबांना त्रास दिला तर याद राखा, मात्र गेल्या आषाढी यात्रेत मंदिर परिसरातील गरिबांना त्रास देण्यात आला. शहरातील व्यापाऱ्यांची अतिक्रमणे काढण्यात आली. यामुळे तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. मात्र लोकप्रतिनिधी लोकांच्या कामासाठी धावून आले नाहीत, यामुळे यंदाच्या निवडणुकीत अशा लोकप्रतिनिधीला घरी बसविण्याची वेळ आली आहे तरी मतदारांनी मतदान करून आशीर्वाद देऊन विजयी करावे असे आवाहन भगीरथ भालके यांनी केले.

## मतदानासाठी लऊळ येथे जनजागृती



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा :** विधानसभा निवडणुकीमध्ये लोकांनी उत्स्फूर्तपणे मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे. स्वीप मल्टीमीडिया व्हॅनचे माढा तालुक्यातील लऊळ येथे उत्साहात करण्यात आले. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी आणि नव मतदारांना मतदान करण्यासाठी प्रेरित करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य आणि केंद्रीय संचार ब्यूरो, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेल्या स्वीप मल्टीमीडिया व्हॅनच्या माध्यमातून जिल्ह्यात जनजागृती सुरू आहे.



## उमा महाविद्यालयाच्या अमोल अमूनेची सोलापूर विद्यापीठाच्या संघात निवड

**पंढरपूर :** खिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉस कंट्री (मुले) स्पर्धा दिनांक १८ ते २० नोव्हेंबर २०२४ या कलावधीत मेंगलोर यूनिवर्सिटी, कर्नाटक यांनी आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये पुण्याशोल्क अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा क्रॉस कंट्री संघ सहभागी होणार असून त्या संघा मध्ये उमा महाविद्यालयात शिक्षण घेत असलेलेला अमोल नानासाहेब अमूने याची निवड झाली असून अमोल अमूनेच्या यशाबद्दल संथेचे अध्यक्ष मा. आ. प्रशांत परिचारक, उपाध्यक्ष मा. श्री. मुकुंदराव परिचारक, खजिनदार मा. श्री. रमेश लाड, सचिव मा. श्री. राजगोपाल भट्टड, विश्वस्त मा. श्री. प्रणव परिचारक व इतर संस्था पदाधिकारी, महाविद्यालयाचे कार्यवाहक मा. प्राचार्य डॉ. मिलिंद परिचारक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धिरजकुमार बाड यांनी अमोलला कॉलेज कडून ट्रॅकसूट देऊन त्याचा सत्कार करून अभिनंदन केले. खेळाडूंना प्राचार्य डॉ. धिरजकुमार बाड, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद ढवण, व जिमखाना कमिटीचे सर्व सदस्य यांचे मार्गदर्शन लाभले. सत्कार कार्यक्रमाप्रसंगी सर्व प्राध्यापक, कार्यालयीन अधीक्षक श्री. एस. डी. पारखे, सर्व प्रशासकीय सेवक, महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.

## दक्षिण मधील दिग्गज नेते आले एकत्र




**सोलापूर :** सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांच्या प्रचारार्थ दक्षिण सोलापूर तालुक्यातील दिग्गज नेते मंडळी एकत्र आल्याचे दिसून आले. भंडारकवठे येथील बैठकीत माजी आमदार दिलीप माने, राजशेखर शिवदारे, सुरेश हसापुरे, बाळासाहेब शेळके, हरीश पाटील, जाफरताज पाटील, भीमाशंकर जमादार, अशोक देवकते, शिवानंद पाटील कुडल, सिकंदरताज पाटील, वसंत पाटील, विठ्ठल पाटील, महादेव पाटील, प्रा. व्ही. के. पाटील, चिदानंद कोटगोंडे, आप्पासाहेब काळे आदींनी काडादी यांना विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## मतदानाचा टक्का वाढण्यासाठी अफलातून निर्णय
# स्वीट्स असोसिएशन देणार १० टक्के सवलत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** येथील श्री विठ्ठल कृपा स्वीट्स ब्रेकर्स हॉटेल्स असोसिएशनच्या वतीने मतदानानिमित्त खाद्यपदार्थावर दहा टक्के सवलत देण्याची घोषणा करण्यात आली आहे. मतदान करा आणि ४० विविध खाद्यपदार्थावर १० टक्के सवलत मिळवा अशी ही योजना असल्याचे पांडुरंग बापट यांनी एका पत्रकाद्वारे कळविले आहे.



बुधवार दि. २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकी संदर्भातील मतदान आहे. हल्ली मतदानाचा टक्का घटू लागला आहे. त्यावर विविध संस्था, संघटना आणि व्यक्तीकडून जनजागृती करण्यात येत आहे. त्या अंतर्गतच तीर्थक्षेत्र पंढरपूरातील श्री विठ्ठल कृपा स्वीट्स बेकर्स हॉटेल्स असोशियन मतदान केलेल्या प्रत्येकाला बिलावर दहा टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. लोकशाही बळकट करण्यासाठीच आम्ही बनवलेल्या चाळीस खाद्यपदार्थावर १० टक्के सवलत आम्ही ग्राहकांना देणार आहोत. मतदाना दिवशी म्हणजे 20 नोव्हेंबर रोजी सकाळपासून रात्रीपर्यंत ही सवलत सुरू राहील. तरी जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करून लोकशाही बळकट करावी व आमच्या या सवलतीचा फायदा घ्यावा असे आवाहन असोसिएशन कडून पांडुरंग बापट यांनी केले आहे.

## बटेंगे तो कटेंगे ही महाराष्ट्राची संस्कृती नाही



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** राज्यात जातिधर्मांत तेढ निर्माण करण्याचे काम भाजपने केले आहे. 'बटेंगे तो कटेंगे' ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. विद्यमान सरकार ठेकेदार धार्जिणे आहे. पैसे खाण्याला मर्यादा नाही. दोन टक्क्यांनी दरडोई उत्पन्न घसरल्याची टीका खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केली. काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धाराम म्हेत्रे यांच्या प्रचारार्थ खासदार मोहिते-पाटील यांची जाहीर प्रचार सभा चुंगी येथे पार पडली. त्यावेळी उपस्थित मतदारांना मार्गदर्शन करताना खासदार ते बोलत होते.

## अविनाश पाटील यांचे स्कॉटलंड देशात तबला वादन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** युवा पिढीतील प्रसिद्ध तबला वादक अविनाश पाटील यांच्या सोलो तबला वादनाची मैफल एडिनबरा( स्कॉटलंड ) येथे होणार आहे. ही मैफल दिनांक २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६:३० वा स्कॉटलंड देशातील एडिनबरा या शहरातील क्रॅमोंड किर्क हॉल येथे होइल. एसओडीइसीएस ऑर्गनायझेशन तर्फे त्यांच्या तबला वादनाची मैफल आयोजित करण्यात आली आहे. पाटील हे प्रसिद्ध तबला वादक गुरु पं. प्रमोद पाटील व पं उमेश मोघे यांचे शिष्य आहेत. सवाई गंधर्व संगीत महोत्सवासह देशात व परदेशात अनेक ठिकाणी पद्मभूषण पं. राजन साजन मिश्रा यांच्या सह अनेक दिग्गज कलाकारांना त्यांनी तबला साथ संगत दिली आहे तसेच सोलो तबला वादन सादर करुन जगभरातील रसिकांची दाद मिळवली आहे.



पाहिजे

हॉस्पिटल मध्ये स्टाफ आणि मावशी
शिक्षण:- ANM \ GNM \ १२ वी पास
पत्ता:- कोडलकर हॉस्पिटल
लिंक रोड,पंढरपूर
फोन नंबर :- ८२९१३१५०८९

# भाजपच्या कार्यकर्त्यांना पैसे वाटताना पकडले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील घरकुल परिसरात मतदारांना पैसे वाटताना भाजपच्या कार्यकर्त्यांना महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी रविवारी रात्री साडे अकरा वाजण्याच्या सुमारास पकडले आहे. सुदेश देशमुख, राजू देशमुख, सतीश भरमशेट्टी, रोहन सोमा अशी त्यांची नावे असून यातील एकजण वकील असल्याचे कळते. माजी नगरसेवक प्रथमेश कोठे, विठ्ठल कोटा यांनी त्यांना रंगेहाथ पकडले आहे. यावेळी दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार वादावादी व शिवीगाळ झाली. मात्र या घटनेची नोंद अद्याप पर्यंत पोलीस ठाण्यात झालेली नाही. याबाबत विरोधी पक्षातील नेत्यांनी सुद्धा याची दखल घेतली नाही. त्यामुळे नागरिकांत उलट-सुलट चर्चा होताना दिसत आहे.




## प्रचाराची सांगता...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**माढा :** माढा विधानसभा मतदार संघात उमेदवार अभिजीत पाटील यांनी प्रचाराच्या शेवटच्या दिवशी फेरी काढून मतदार बंधू-भगिनींचे आभार मानले. आणि प्रचाराची सांगता केली. आभार व्यक्त करताना अभिजीत पाटील यांचे घेतलेले छायाचित्र.

## आ. देशमुख यांच्या प्रचारार्थ कॉर्नर सभा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार विजयकुमार देशमुख यांच्या प्रचारार्थ एसटी स्टॅन्ड समोरील धरमसी लाईन येथे कॉर्नर सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हा अध्यक्ष संतोष पवार, महिला शहराध्यक्षा संगीता जोगधनकर, माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख, युवती अध्यक्षा किरण माशाळकर, कांचन पवार, प्रिया पवार, सुरेखा घाडगे, अनुराधा बनसोडे आदी पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विजय देशमुख यांना विजयी करण्याचे आवाहन उपस्थित नेत्यांनी आपल्या भाषणात केले.




## जिल्ह्यात ३० हजार दिव्यांग मतदारांची नोंदणी

# दिव्यांगांसाठी १ हजार ४३६ व्हीलचेअर तर १ हजार ८३२ रॅम्पची व्यवस्था

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या आदेशानुसार सोलापूर जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघात मागील तीन आठवड्यात दिव्यांग मतदारांचे सर्वेक्षण व नोंदणी अभियान पूर्ण झाले असून यात २९ हजार ९८९ दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. ज्यांना मतदान केंद्रापर्यंत चालत जाणे शक्य नाही, अशा दिव्यांग मतदारांसाठी १ हजार ४३६ व्हीलचेअर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. तर १ हजार ८३२ केंद्रांवर रॅम्पची व्यवस्था असल्याची माहिती दिव्यांग नोडल अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी सचिन कवले यांनी दिली. मतदार मतिमंद किंवा अंध असेल तर त्यांचे नातेवाईक त्यांच्यासोबत मतदान केंद्रामध्ये जाऊ शकतात,असेही कवले म्हणाले.



विधानसभा निवडणुकीमध्ये दिव्यांग मतदारांनीही मतदान करावे, त्यांचा मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी दिव्यांग मतदार जागृती अभियान राबविण्याची सूचना जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिली होती. प्रभारी जिल्हा समाज कल्याण अधिकारी सचिन कवले यांची दिव्यांग मतदार नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. कवले यांनी जिल्ह्यातील दिव्यांग शाळांमधील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचा-यांची या अभियानासाठी नियुक्ती करुन जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदार संघात दिव्यांग मतदार जागृती अभियान राबविले. यासाठी वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता शशिकांत ढेकळे, समन्वयक रामचंद्र कुलकर्णी यांनीही नियोजन केले.

### दिव्यांग मतदारांमध्ये झाली जागृती

जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात दिव्यांग मतदारांचे जागृती वनोंदणी अभियान पूर्ण झाले असून जिल्ह्यातील दिव्यांग शाळांमधील कर्मचारी, ग्रामविकास अधिकारी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका यांचीही या कामासाठी मदत झाली. या उपक्रमामुळे दिव्यांग मतदारांमध्ये मतदानाबद्दल जागृती निर्माण झाली आहे. त्यामुळे मतदानाचा टक्का नक्की वाढेल – सचिन कवले, दिव्यांग मतदार नोडल अधिकारी,जिल्हा समाज कल्याण अधिकारी सचिन कवले यांनी काटेकोरपणे नियोजन केल्यामुळे दिव्यांग मतदारांचे नोंदणी अभियान प्रभावीपणे पार पडले. दिव्यांग शाळांमधील नियुक्त केलेल्या सर्वकर्मचा-यांचे या उपक्रमासाठी चांगले सहकार्य लाभले – शशिकांत ढेकळे, प्रभारी वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, व्यिांग मतदारांमध्ये मतदानाविषयी फारसा उत्साह नव्हता. मात्र, या अभियानामुळे आम्हीही लोकशाहीचे घटक आहोत, ही जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण झाली आहे. जिल्हा समाज कल्याण अधिकारी सचिन कवले यांनी दररोज या अभियानाचा आढावा घेऊन तसेच स्वतः बहुतांशी तालुक्यांमध्ये जाऊन दिव्यांग मतदारांमध्ये मतदान करण्याबाबत जागृती केली आहे. त्यामुळे हे अभियान यशस्वी झाले.

पंढरी संचार

# सामाजिक भान जागृत असणारे विद्यार्थी घडवणे हे शिक्षकांचे कर्तव्य

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** 'आपले विद्यार्थी स्वावलंबी बनण्यासाठी साने गुरुजींनी आपले आयुष्य समर्पित केले. १८९९ ते १९५० या त्यांच्या ५१ वर्षाच्या आयुष्यामध्ये साने गुरुजींनी विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवण्यासाठी, त्यांना आकार देण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी आयुष्य वेचले. साने गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करताना त्यांच्यातील विविध पैलू समोर येतात. साने गुरुजी हे संवेदनशील होते त्यामुळे त्यांचे विद्यार्थी हे शिकून मोठे व्हावेत असे त्यांना सतत वाटायचे. त्यांनी सेवेचे, समाजाचे मूल्ये जपली. गुरुजींनी गरिबी जवळून अनुभवली होती. गुरुजी स्वतः शाळेत लावण्याची भित्तिपत्रके तयार करायचे आणि नित्य नियमाने ते शाळेत लावायचे. शिक्षणाबरोबरच संस्कार देणे व सामाजिक भान जागृत असणारे विद्यार्थी घडवणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे.' असे प्रतिपादन शिक्षणतज्ञ हेरंब कुलकर्णी यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस), कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (डिप्लोमा), कॉलेज ऑफ फार्मसी( डिग्री), कॉलेज ऑफ फार्मसी (डिप्लोमा), तसेच कासेगाव (ता पंढरपूर) मधील श्री. विठ्ठल इन्स्टिट्यूट ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संचलित लोटस इंग्लिश स्कूल व इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर अँड मॅनेजमेंट स्टडीज् (आयसीएमएस) मधील शिक्षकांसाठी स्वेरीच्या इंटरनॅशनल कॉन्फरन्स हॉलमध्ये खास शिक्षकांसाठी 'साने गुरुजी आणि शिक्षक' या विषयावर आयोजिलेल्या या मार्गदर्शन सत्रामध्ये अकोले (जि.अहमदनगर) मधील शिक्षणतज्ञ हेरंब कुलकर्णी हे मार्गदर्शन करत होते. पुढील महिन्यात (दि.२४ डिसेंबर २०२४) साने गुरुजींची १२५ वी जयंती आहे त्या निमित्त हेरंब कुलकर्णी हे पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजींच्या जीवनावर राज्यभर व्याख्यान देत असून साने गुरुजींच्या जीवनाचे व कार्याचे महत्व सांगत आहेत. स्वेरीमध्ये २५ वे पुष्प गुंफत असताना सानेगुरुजींच्या विविध पैलूंवर ते प्रकाश टाकत होते. स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. पुढे बोलताना हेरंब कुलकर्णी म्हणाले की, 'साने गुरुजी हे आपल्या पगारातून विद्यार्थ्यांची फी भरायचे. विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी आपण किती समर्पण करू शकतो? हे साने गुरुजींच्या कृतीतून समजते तसेच गुरुजी प्रेमळ व आक्रमक देखील होते. विद्यार्थी का शिकले नाहीत यासाठी शिक्षकांना जबाबदार ठरवणाऱ्या पालकांना साने गुरुजी वेळप्रसंगी ठणकावून जाब विचारायचे. आजचा जमाना हा करिअर घडविण्याचा असताना साने गुरुजींचे विद्यार्थ्यांना शिकविण्याचे कार्य अधिक महत्त्वाचे वाटते.' असे सांगून साने गुरुजींच्या अनेक कवितांवर प्रकाश टाकून त्यांचे अर्थ स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणातून स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे म्हणाले की, 'अवघड कार्य करताना सामाजिकतेचे भान जपले पाहिजे. विद्यार्थ्यांचे करीअर घडवणाऱ्या शिक्षकांचे कार्य तर सर्वोतम तर आहेच परंतु पालकांनी देखील विद्यार्थ्यांच्या उज्वल करिअरसाठी सतर्क राहणे अत्यंत गरजेचे आहे.' असे सांगून 'साने गुरुजी आणि पंढरपूर' यांचे नाते सांगून साने गुरुजींच्या जीवनातील विविध घटनांवर लक्ष केंद्रित केले. शिक्षणतज्ञ हेरंब कुलकर्णी यांनी आपल्या दोन तासाच्या मार्गदर्शनामध्ये साने गुरुजींच्या शिक्षण पद्धतीतील महत्त्वाचे टप्पे सांगितले.यावेळी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम पवार, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी.मनियार, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (डिप्लोमा) चे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस. व्ही. मांडवे, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, प्रा. शेळके, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम.एस.मठपती, सांस्कृतिक कार्यक्रम विभागप्रमुख डॉ.आर. एन. हरीदास, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर लोटस इंग्लिश स्कूलच्या प्राचार्य डॉ.जयश्री चव्हाण यांनी आभार मानले.

## महाराष्ट्रात आणखी एका कुटुंबात फूट पडणार?



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा:** माढा विधानसभा मतदारसंघात आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचे बंधू शिवाजी सावंत नाराज असल्याने सावंत कुटुंबात तणाव वाढला आहे. शिवाजी सावंत यांनी शिवसेनेतून वेगळा निर्णय घेण्याचे संकेत दिले आहेत. पंढरपूरमधून तानाजी सावंतांचे पुतणे अनिल सावंत यांना राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाने उमेदवारी दिल्याने शिवाजी सावंत नाराज आहेत. त्यांनी कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात, "आता निर्णय सावंत बंगल्यावरून होईल," असा इशारा दिला आहे. त्यांच्या प्रभावामुळे माढा, पंढरपूर आणि सोलापूरच्या राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

## महाराष्ट्रात महाविकास आघाडीची सत्ता येणार



**सोलापूर :** महाविकास आघाडीचे सरकार हे गोरगरीब जनतेच्या हिताचे निर्णय घेणारे होते. त्या उलट भाजपचे सरकार हे फक्त अदानी, अंबानी आणि व्यापाऱ्यांच्या हितासाठीच आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचेच सरकार येणार आहे. तेव्हा जनतेने सर्वांगीण विकासासाठी महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना मताधिक्याने निवडून द्यावे, असे आवाहन कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी सोलापुरात पत्रकार परिषदेत केले. ते आज महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सोलापुरात आले असता आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

## मतदार ओळखीसाठी 'या' बाबींचा समावेश



**सोलापूर :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 करीता जे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करु शकत नाहीत असे मतदार त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्राच्या व्यतिरिक्त इतर कागदपत्रे पुरावा म्हणून सादर करु शकतील, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली. यामध्ये आधार कार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बॅंका, पोस्ट ऑफिसने जारी केलेल्या छायाचित्रासह पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजने अंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड आदी कागदपत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

## काँग्रेसला शहर मध्य ताब्यात ठेवण्याचे आव्हान



**सोलापूर :** सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ गेल्या 3 निवडणुकांपासून काँग्रेसच्या ताब्यात आहे. या मतदार संघातून काँग्रेसच्या प्रणिती शिंदे या विजयी झाल्या आहेत. मात्र त्या आता नुकत्याच लोकसभेवर निवडून गेल्याने हा मतदारसंघ आता काँग्रेसच्या ताब्यात ठेवण्याचे आव्हान त्यांच्यापुढे असणार आहे. या मतदारसंघातून काँग्रेसचे चेतन नरोटे, भाजपचे देवेंद्र कोठे व एमआयएमचे फारूक शाब्दी यांच्यात चुरशीची लढत होईल अशी अपेक्षा आहे. याशिवाय माकपचे माजी आमदार नरसय्या आडम मास्तर हे देखील किती प्रभावी ठरतात हे महत्त्वाचे आहे.

## माळशिरसमध्ये जानकरांसमोर राम सातपुतेंचे आव्हान

**माळशिरस :** माळशिरस विधानसभेत मागील लोकसभा निवडणुकीत पराजित झालेल्या राम सातपुते हे भाजपाच्या तिकीटावर निवडणूक रिंगणात उभे असून त्यांच्यासमोर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचे उत्तम जानकर हे पक्षाचे फायरब्रँड नेते उभे आहेत. शरद पवार गटाने जानकर यांची उमेदवारी जाहीर केल्यानंतर या मतदारसंघात भाजपाचा उमेदवार ठरत नसल्याने बहुधा मी बिनविरोध आमदार बनणार असे स्वप्न जानकर यांनी पाहिले होते, परंतु आता त्यांच्यासमोर राम सातपुते यांचे आव्हान असेल.

# पूर्वीच्या 23 मतदान केंद्रात अधिकाऱ्यांनी केला बदल; नवीन 20 केंद्रे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** भारत निवडणूक आयोगाने दि. 01 जुलै या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार याद्यांचा विशेष पुनरिक्षण कार्यक्रम घोषीत केलेला आहे. त्यानुसार 252- पंढरपूर विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्राच्या नवीन, स्थलांतरीत, नावात बदलाबाबत निर्णय घेण्यात आलेले आहेत. पुर्वी मतदार संघात 337 मतदान केंद्रे होती. यात नवीन 20 वाढीव मतदान केंद्र स्थापन करण्यात आली आहेत. त्यानुसार आता 357 मतदान केंद्र तयार झाली आहेत. त्याचबरोबर मतदारसंघातील 23 मतदान केंद्रांच्या ठिकाणात बदल करण्यात आला असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

पंढरपूर विधानसभा मतदारसंघासाठी शिरढोण, वाखरी, गादेगांव, टाकळी (2), पंढरपूर शहर (3), तावशी,घरनिकी, मंगळवेढा शहर (4), अकोले, खुपसंगी, लमाणतांडा, जित्ती, रड्डे, शिवणगी या ठिकाणी नव्याने मतदान केंद्र स्थापन करण्यात आली आहेत.

तसेच शिरढोण- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, इसबावी- मोहसीन विद्यालय (2) , गादेगांव- न्यु इंग्लिश स्कुल, नवीन इमारत (2), कासेगांव (3) – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कचकल वस्ती, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बेंद वस्ती , खर्डी (2) बीएसएनएल दुरध्वनी केंद्र, एकलासपूर (2) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रांझणी (3) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मंगळवेढा शहर (4)- नगरपालिका शाळा नं-5, मरवडे- जिल्हा परिषद प्राथमिक मुलींची शाळा तसेच नंदेश्वर -(3) बाळकृष्ण विद्यालय या ठिकाणी मतदान केंद्र बदललेली आहेत.

पंढरपूर विधानसभा मतदासंघातील नव्याने स्थापन करण्यात आलेल्या मतदान केंद्र तसेच ठिकाणात बदल करण्यात आलेले सदर मतदान केंद्र असून, मतदारांनी दिनांक 20 नोव्हेंबर 2024 रोजी कोणात्याही दबावाला, प्रलोभनला बळी न पडता निर्भयपणे मतदान करुन आपल्या मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

# प्रचार संपला; आता लक्ष्मी दर्शनाकडे मतदारांचे लक्ष

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

विधानसभा निवडणुक

**पंढरपूर :** पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघासाठी 20 नोव्हेंबर रोजी मतदान घेण्यात येणार आहे. यामुळे आज सोमवारी प्रचार संपला आहे. यामुळे आता मतदारांचे लक्ष लक्ष्मीदर्शनाकडे लागले असल्याची चर्चा होत आहे.

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात यंदा चौरंगी लढत होणार आहे. यामुळे या लढतीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. या मतदार संघात महायुती भाजपने आमदार समाधान अवताडे, महाविकास आघाडी काँग्रेसकडून भगीरथ भालके, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून अनिल सावंत तर मनसेकडून दिलीप धोत्रे निवडणूक रिंगणात उतरले आहेत. यामुळे मतदारांना आकर्षित करण्यासाठी उमेदवाराकडून रस्सीखेच सुरू असल्याचे दिसून येत आहे. गेल्या पंधरा दिवसापासून चारही उमेदवारांनी जोमाने प्रचार केला असून होम टू होम प्रचार झाला आहे. तसेच आरोप प्रत्यारोपाच्या फेरी झाडण्यात आल्या आहेत. निवडणूक प्रचारासाठी मातब्बर नेते मंडळींनी हजेरी लावली होती. निवडणुकीचा प्रचार आज सोमवारी सायंकाळी सहा वाजता संपला आहे. यानंतर आता गुप्त बैठकावर भर देण्यात येणार असून मतदारांचे लक्ष लक्ष्मीदर्शनाकडे लागले आहे. यंदाच्या निवडणुकीत चौरंगी लढत होणार असल्याने मते मिळविण्यासाठी उमेदवार प्रयत्न करत आहेत. यासाठी मतदारांना लक्ष्मी दर्शन देण्यात येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. या मतदारसंघात चौरंगी लढत होणार असल्याने कोण विजयी होणार याकडे लक्ष लागले आहे. 20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. यासाठी प्रशासनाने संपूर्ण तयारी पूर्ण केली आहे. मतदान शांततेत पार पडावे यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. तसेच कांही अपक्ष उमेदवारांनीही आपापल्या परिने प्रचार केला आहे. त्यामुळे अपक्षांमुळे कांही मते विभागली जाणार आहेत. परंतु खरी लढत ही चार उमेदवारातच होणार आहे. कोण विजयी होणार याबाबत मतदारांमध्ये तर्क वितर्क लढविले जात असल्याचे मतदारांच्या चर्चेवरुन दिसून

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

# मतदार फोटो ओळख पत्राव्यतिरिक्त इतर 12 कागदपत्रे मतदानासाठी ग्राह्य

**पंढरपूर :** येत्या 20 नोव्हेंबरला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी मतदानाकरीता ग्राह्य धरल्या जाणाऱ्या ओळखपत्रांची यादी निवडणूक आयोगाने जाहीर केली आहे. यात निवडणूक आयोगाच्या ओळख पत्राव्यतिरिक्त इतर 12 ओळखपत्रांचा समावेश करण्यात आला आहे. या 12 ओळखपत्रांपैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर मतदाराला मतदान करता येणार आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ज्या मतदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र आहे, ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. जे मतदार छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करू शकणार नाहीत, त्यांना मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त 12 पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे.

ओळखपत्राचे 'हे' 12 पुरावे मतदानासाठी ग्राह्य : मतदानावेळी मतदारांना दिलेले निवडणूक ओळखपत्र नसल्यास 12 प्रकारच्या पुराव्यांमध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत दिलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहनचालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतन दस्तावेज, केंद्र अथवा राज्य सरकार, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्रांसह ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधान परिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाच्या वतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे 12 पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत.

छायाचित्रासह मतदार ओळखपत्रान्वये मतदाराची ओळख पटत असेल तर मतदार ओळखपत्रातील किरकोळ विसंगती दुर्लक्षित करण्यात येणार आहे. छायाचित्रासह मतदार ओळखपत्रावरील विसंगत छायाचित्रामुळे मतदाराची ओळख पटणे किंवा पटविणे शक्य नसल्यास मतदारास उपरोक्त पर्यायी कागदपत्रापैकी एक ओळख कागदपत्र सादर करणे आवश्यक राहणार आहे. तर प्रवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी केवळ त्यांचा मुळ पासपोर्ट आवश्यक राहणार आहे.

### अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ माढ्यात सांगता सभा संपन्न

# दिल्लीपतीसमोर हुजरेगिरी करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवा : नितीन बानगुडे पाटील

**मा**ढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ माढा येथे नितीन बानगुडे पाटील यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविकास आघाडीचे सर्व घटक पक्षाचे प्रमुख नेते मंडळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना नितीन बानगुडे पाटील म्हणाले की कोरोना काळात महाविकास आघाडीने चांगले काम केले. मात्र पक्ष फोडीचे राजकारण करून महाराष्ट्रातील सर्व प्रकल्प गुजरातला नेऊन महायुती सरकार दिल्ली पती समोर हुजरेगिरी करण्याचे काम करत आहे. सर्व प्रकल्प बाहेर गेल्याने येथील तरुण बेरोजगार झाला आहे. शेतमालाला भाव नाही.राज्यात शेतकरी आत्महत्या करत आहेत. महागाई वाढली आहे. मात्र हे सरकार आश्वासन देऊन देत आहे. त्यांना विचारा पहिल्या आश्वासनाचे काय झालं असा सवाल उपस्थित करत त्यांनी शेतकरी आत्महत्या, आरक्षण, महापुरुषांची स्मारके आणि पंधरा लाख रुपयाचं काय झालं असा सवाल उपस्थित केला. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील जनता हे सहन करणार नाही. हे लोकसभेच्या निवडणुकीला दाखवून दिले आहे. आताही झुकणार नाही असा विश्वास व्यक्त केला. ते पुढे बोलताना म्हणाले की माढ्याचा विकास अनेक वर्षांपासून झाला नाही यासाठी सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन जाणाऱ्या आणि माणसांना उभे करण्याचे काम



अभिजीत पाटील यांनी केले आहे. माढ्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना निवडून द्या असे आवाहन केले. यावेळी बोलताना अभिजीत पाटील म्हणाले की राज्यात पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे. यामुळे मतदार संघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी येथील जनतेने मला साथ द्यावी. असे आवाहन करत त्यांनी येथील लोक पवार साहेबांना सोडून गेले. त्यांना तिकीट नाकारल्यानंतर पवार साहेबांवर आरोप करत आहेत. जरांगे पाटलांवर आरोप केला. समाजाच्या भावना दुखावल्या. त्यांना तुम्ही मतदान करणार का असा सवाल उपस्थित करत विरोधकांकडे विकासाचे व्हिजन नाही. फक्त उसनेला म्हणजे विकास झाला अस नाही. मी कोरोना काळात आर्थिक नुकसान करून नागरिकांसाठी काम केले. बंद पडलेला कारखाना सुरू करून शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ दिले. मात्र समोरच्या उमेदवाराने दूध संघ बंद पाडला. दुधाचा भाव पाडला. त्याच्या जमिनी विकल्या, शेतकऱ्यांच्या उताऱ्यावर कर्ज काढून शेतकऱ्यांना देसोधडीला लावले. मात्र मी शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून काम केल्याने जनता मला साथ देत आहे. मी आमदार झाल्यावर माढ्याचा पाण्याचा प्रश्न सोडवेन, सीना माढा प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू करेन, माढ्यात नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करेन. आरोग्याची, शिक्षणाची सोय तसेच युवकांसाठी प्रशस्त जिम उभारण्यात येईल, माढ्यात गणपतराव साठे यांचे भव्य स्मारक उभारण्यात येईल, युवकांना नोकरी मिळावी यासाठी एमआयडीसी उभारण्यात येईल, रस्ते चकाचक करण्याचे काम करेन, मतदार संघात सर्व ठिकाणी महापुरुषांची स्मारके उभारण्यात येतील असा विश्वास देत मी विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवून काम करत आहे. ही निवडणूक आमदार पुत्राविरुद्ध शेतकऱ्यांचा मुलगा अशी आहे. ते अनेक अफवा पसरवतील मात्र येथील जनता दोघांचीही तुलना करून मतदान करेल असा विश्वास व्यक्त केला. ते पुढे बोलताना म्हणाले की विरोधक दादांच्या पुण्याईवर निवडून देण्याची आवाहन करत आहेत तर माझ्या घराण्याने पांडुरंगाची मूर्तीचे संरक्षण केली आहे. मी कर्तृत्व सिद्ध केल आहे. म्हणून मला लोकांनी स्वीकारल आहे. येथील जनता मला सेवा करण्याची संधी देईल असा विश्वास व्यक्त करत विरोधकांनी केलेल्या टीकेचा आपल्या शब्दात समाचार घेतला.

पंढरी संचार

» पान १ वरुन

## निवडणूक अधिकाऱ्यांची गस्त तर नेते मंडळी ....

मुख्य अधिकारी व जिल्हाधिकारी श्री.कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाची टेहळणीही काळजीपूर्वक काटेकोरपणे होत असल्याचे दिसून येत आहे. आज मंगळवेढा शहरातून हायवेला मिळणाऱ्या रस्त्यावर तसेच पंढरपूर सोलापूर रस्त्यावर आणि पुणे रस्त्यावर साधारणपणे भंडीशेगांवपर्यंत वाहनांची ये-जा होत असताना पोलीस पथकांकडून त्याची तपासणी होतानाही दिसून येते.

सोलापूर आणि नाशिक येथील प्रकार पाहता पंढरपूर शहरात विभागवार वाटण्यात येणाऱ्या खिरापतीबाबत संबंधितांकडून अतिदक्षता घेतली जात असून सावधानता बाळगून मतदानापुर्वी करण्यात येणारी प्रक्रिया काळजीपूर्वक होत असताना दिसते. आज पंढरपूर शहरात सुद्धा पोलिसांची गस्त रात्री बराच उशीरापर्यंत दिसून येत होती. तसेच सक्षम निवडणूक अधिकाऱ्यांच्या मार्फत योग्य ती दक्षताही घेतली जाताना दिसते. त्यामुळे भरारी पथक कार्यरत तर नेते मंडळीत सावधानता बाळगताना दिसत होती.

## हौदात बुडून तरुणाचा मृत्यू

**सोलापूर :** विडी घरकुल कुंभारी येथील राहत्या घराजवळ एका वीटभट्टीच्या हौदात पडून तरुणाचा मृत्यू झाला. हा प्रकार रविवारी दुपारी 12. 15 वाजण्याच्या सुमारास उघडकीस आला. बालाजी विठ्ठल पासकंटी ( वय 24, रा. विडी घरकुल, कुंभारी ) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. बालाजी हा एका कारखान्यात शिलाईचे काम करत होता. ते काम सोडून तो दुसरीकडे कामाला गेला होता.

# मणिपूर पुन्हा पेटले!

मणिपूरच्या हिंसाग्रस्त जिरिबाम जिल्ह्यातून गेल्या आठवड्यात बेपत्ता झालेल्या तिघांचे मृतदेह शुक्रवारी सापडल्यानंतर नागरिकांमध्ये उसळलेल्या संतापाचे लोण राजधानी इम्फाळपर्यंत पसरले. मृतांना न्याय मिळण्याची मागणी करणाऱ्या संतप्त निदर्शकांनी दोन मंत्री आणि तीन आमदारांच्या निवासस्थानांवर हल्ले केले. त्यानंतर प्रशासनाने इम्फाळ पश्चिममध्ये बेमुदत संचारबंदी लागू केली. जमावाने आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री सपम रंजन यांच्या लाम्फेल सानकीथेल भागातील घरावर हल्ला केला. सपम रंजन यांच्यासह ग्राहक व्यवहार आणि सार्वजनिक वितरण मंत्री एल. सुसिंद्रो सिंह यांच्याही निवासस्थानावर जमावाने हल्ला केला. संतप्त निदर्शकांनी इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील सागोलबंद भागातील भाजपचे आमदार आणि मुख्यमंत्री एन. बीरेन सिंह यांचे जावई आर. के. इमो यांच्या घरासमोर घोषणा दिल्या. गत आठवड्यात जिरिबाम जिल्ह्याच्या बोरोबेक्रा उपविभागामध्ये जाकुरादोर कारॉंग येथे सुरक्षा दलाबरोबर झालेल्या चकमकीत कुकी–झो समुदायाचे १० बंडखोर ठार झाले होते. त्यावेळी मदत शिबिरामधील काही व्यक्ती बेपत्ता झाल्या होत्या. त्यापैकी दोघांचे मृतदेह दुसऱ्या दिवशी शोधमोहिमेदरम्यान सापडले होते. आणखी बेपत्ता सहा जणांचा शोध सुरू होता. त्यापैकी एक महिला आणि दोन लहान मुले अशा तीन जणांचे मृतदेह शुक्रवारी मणिपूर–आसाम सीमेवर जिरी आणि बराक नद्यांच्या संगमाजवळ सापडले. त्यानंतर नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आणि त्यांनी निदर्शने सुरू केली. गत सोमवारी सुरक्षा दलाबरोबरच्या चकमकीत ठार झालेल्या संशयित १० कुकी–झो अतिरेक्यांचे मृतदेह हेलिकॉप्टरने आसामच्या सिल्चर रुग्णालयात पाठवण्यात आले. शवविच्छेदनानंतर मृतदेह चुराचांदपूरला पाठवण्यात आले. त्यापूर्वी मृतदेह आपल्या ताब्यात देण्यात यावेत अशी मागणी करत या तरुणांचे कुटुंबीय रुग्णालयाच्या बाहेर जमले होते. त्यांना पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला. दरम्यान राज्यात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत असा आदेश गृहमंत्रालयाने मणिपूरमध्ये तैनात करण्यात आलेल्या सर्व सुरक्षा यंत्रणांना दिला आहे. दोन्ही समाजातील सशस्त्र दंगलखोर हिंसाचार घडवत आहेत. त्यामुळे निष्पापांचे हकनाक बळी जात आहेत असे गृहमंत्रालयाने म्हटले आहे. हिंसाचार करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करा, असा आदेशही देण्यात आला आहे. मैतेई आणि कुकी–झो यांच्यातील वांशिक संघर्षामुळे गत जवळपास दोन वर्षांपासून धुमसत असलेल्या मणिपूरमध्ये शनिवारी पुन्हा एकदा हिंसाचाराचा उद्रेक झाला. जिरिबाम जिल्ह्यात हत्या करण्यात आलेल्या तीन व्यक्तींना न्याय देण्याची मागणी संतप्त जमावाने केली. त्यामुळे प्रशासनाला तेथे दुपारपासून संचारबंदी जारी करणे भाग पडले. संतप्त जमावाने आमदारांच्या घरांवर हल्ले केले. त्यामुळे इम्फाळ पश्चिम प्रशासनाने तेथे बेमुदत कालावधीसाठी संचारबंदी जारी केली. जिरिबाम जिल्ह्यात तीन व्यक्तींची हत्या झाली तो प्रश्न मंत्रिमंडळाच्या बैठकीत उपस्थित करण्याचे आश्वासन मंत्री सपम रंजन यांनी दिले असून जनतेच्या भावनांची कदर न झाल्यास मंत्रिपदाचा राजीनामा देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. जेव्हा रोम जळत होते, तेव्हा निरो फिडेल वाजवत होता म्हणे. ही म्हण केंद्र सरकारला तंतोतंत लागू पडते. कारण गत सुमारे दोन वर्षांपासून मणिपूर जळत आहे. मणिपूरमधील जनतेचे प्रश्न समजून घ्यावेत, मैतेई आणि कुकी यांच्यात वर्षानुवर्षे सुरू असलेला वाद कायमचा मिटवावा, त्यांच्या जखमांवर मायेची फुंकर घालावी असे केंद्रातील राज्यकर्त्यांना वाटतच नाही अथवा तशी ठोस कृतीही त्यांच्याकडून होत नाही. मणिपूरच्या प्रश्नावर आजवर झालेल्या बैठकांमधून कोणताही सन्मानजनक तोडगा काढता आलेला नाही. 'इच्छा तेथे मार्ग' असे म्हणतात. केंद्राची तशी इच्छाच दिसत नाही. मणिपूरबाबत केंद्राच्या भूमिकेवर कॉंग्रेसने नेहमीच टीकेची झोड उठवली आहे. हिंसाचारग्रस्त मणिपूरला जाण्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी टाळाटाळ करीत असल्याचा आरोप कॉंग्रेसने केला आहे. मोदी नियमितपणे परदेशात सहलीला जातात मात्र ते मणिपूरला जाण्याचे का टाळतात ते अनाकलनीय आहे, असे कॉंग्रेसचे नेते जयराम रमेश यांनी म्हटले आहे. केंद्राने मणिपूरचा प्रश्न वाऱ्यावर सोडला आहे. सध्या मणिपूरमध्ये दयनीय व केविलवाणी परिस्थिती निर्माण झालेली आहे. ही परिस्थिती मानवनिर्मित आहे. त्यामागे राजकारण आहे तसेच बड्या उद्योगपतींचे अर्थकारणही आहे. मणिपूरमधील मैतेई समाज प्रगत तर कुकी आदिवासी समाज आजही मागास आहे. मणिपूरच्या डोंगरावर बड्या उद्योगपतींचा डोळा आहे. त्यामुळेच मणिपूरमध्ये मैतेई व कुकी यांच्यातील संघर्ष तीव्र झाला आहे. मैतेई समाजाला सत्ताधाऱ्यांनी सातत्याने झुकते माप दिल्याने मैतेई–कुकी संघर्ष अधिकच तीव्र बनला आहे. या संघर्षात शेकडो बांधव प्राणास मुकले आहेत. हजारो नागरिक विस्थापितांचे जीणे जगत आहेत. राज्यात तणावपूर्ण परिस्थिती आहे. मणिपूरमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याची, मैतेई–कुकी बांधवांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करण्याची तातडीची गरज असताना पंतप्रधान मोदी व गृहमंत्री अमित शहा हे सध्या महाराष्ट्राच्या निवडणूक प्रचार दौऱ्यात व्यस्त आहेत. मणिपूरमध्ये मैतेई समाज खोऱ्यात तर कुकी समाज डोंगराळ भागात राहतो. मैतेई समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा देण्याची विनंती राज्य सरकारने मान्य करावी, असे आदेश मणिपूर उच्च न्यायालयाने २० एप्रिल २०२३ रोजी दिले आहेत. त्यामुळे डोंगराळ भागातील आपली जमीन खरेदी करण्याचा धनाढ्य मैतेई समाजाचा मार्ग मोकळा होईल अशी भीती कुकी व नागा आदिवासींना वाटते आहे. त्यातूनच मैतेई व कुकी यांच्यातील संघर्ष अधिकच तीव्र झाला आहे. दोन्ही समाज परस्परांच्या जीवावर उठले आहेत. महिलांची नग्न धिंड, बलात्कार, जाळपोळ, लूटमार, हिंसाचार आदी प्रकार त्यामुळेच घडत आहेत. दोन्ही समाजातील शत्रुत्व संपवणार कोण आणि कसे?

---

> सशक्त आणि विकसित भारत निर्मिती करणे, त्यास जगातील आर्थिक महाशक्ती म्हणून नावारुपास आणणे आणि अर्थव्यवस्थेचे सोनेरी चित्र निर्माण करणे यासाठी मोदी सरकार गेल्या १० वर्षांपासून प्रयत्नशील असून त्याचे परिणामही दिसून येत आहेत. असे असताना भारतातून होणारे धनिकांचे स्थलांतर रोखता येत नाहीये. चालू वर्षी सुमारे ४३०० कोट्यधीशांनी भारताला रामराम ठोकल्याचा अंदाज आहे. हे चित्र देशाच्या सधनतेवर आणि आर्थिक विकासाभिमुख वाटचालीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे.

# सुबत्ताकाळातही स्थलांतर का?

भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याबरोबरच समृद्ध आणि संपन्नतेच्या शिखराकडे वाटचाल करत आहे. भारताचा आर्थिक विकास सकारात्मक दिशेने मार्गक्रमण करत आहे. अलिकडच्या आकडेवारीनुसार, देशात सोन्याचा साठा उच्चांकी पातळीवर पोचल्याचे लक्षात येते. दुसरीकडे डीमॅट खाते आणि स्टार्टअपची संख्या वेगाने वाढत आहे. हे सकारात्मक चित्र निर्माण होत असताना आणि सर्वत्र आर्थिक सुबत्ता येत असताना देशात घडणाऱ्या काही गोष्टी विचार करण्यास भाग पाडत आहेत. यातीलच एक चिंताजनक बाब म्हणजे देशाची आर्थिक आघाडीवर घोडदौड सुरू असताना श्रीमंत आणि प्रतिभावान मंडळींचे देशातून बाहेर जाणे.

२०२३ मध्ये सुमारे ५१०० कोट्याधीशांनी देश सोडला तर २०२४ मध्ये सुमारे ४३०० कोट्यधीशांनी भारताला रामराम ठोकल्याचा अंदाज आहे. हे चित्र देशाच्या सधनतेवर आणि आर्थिक विकासाभिमुख वाटचालीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. या स्थितीवर वेळीच ताबा मिळवणे गरजेचे आहे. म्हणून प्रामाणिकपणे आपल्यातील उणिवा दूर कराव्या लागतील. सशक्त आणि विकसित भारत निर्मिती करणे, त्यास जगातील आर्थिक महाशक्ती म्हणून नावारुपास आणणे आणि अर्थव्यवस्थेचे सोनेरी चित्र निर्माण करणे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सातत्याने प्रयत्न करत आहेत. मोदी सरकारने देशाच्या आर्थिक भवितव्य सुधारणाला अधिक लक्ष दिले. विशेष म्हणजे त्यांनी लोकांना आकर्षित करणाऱ्या योजनांच्या माध्यमातून वाहवा मिळवणे किंवा राजकीय फायदा उचलण्याचा प्रयत्न केला नाही. राजकीय हितांपेक्षा देशहिताला प्राधान्य देण्याचा मुद्दा महत्त्वाचा आणि प्रेरणादायी आहे. 'अमृतकाल'चे व्हिजन तंत्रज्ञानाने प्रेरित आणि ज्ञानाधारित अर्थव्यवस्था आकारास आणण्याचे आहे.

पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य देण्यासाठी आपल्याला सध्याच्या सरकाकडून होणाऱ्या प्रयत्नांचे कौतुक करावे लागेल. आर्थिक विकासाचा सक्षम पाया उभा करण्याबरोबरच पायाभूत आराखड्याच्या योजना या रोजगारवृद्धीसाठी आवश्यक असतात. मोदी सरकारच्या नियोजित आणि दूरगामी विचारांचाच परिणाम म्हणजे आरबीआयच्या सोन्याच्या साठ्यातील वाढ. पूर्वीच्या सरकारने देशाचे सोने गहाण ठेवले, परंतु मोदी सरकारने देशाचे सोने परदेशातून आणण्याचे अनोखे प्रयत्न केले. या कारणांमुळेच 'आरबीआय'कडे सप्टेंबर महिन्यांत सोन्याचा साठा ८५४.७३ टन होता. यापैकी ५१०.४६ टन देशात आणि अन्य ३२४.०१ टन सोने परकी बँकांत आहे. आरबीआय सध्या जागतिक पातळीवर सोने खरेदी करणाऱ्या आघाडीच्या पाच केंद्रीय बँकांपैकी एक आहे. भारतीयांच्या घरात २५ हजार टनपेक्षा अधिक सोने आहे. प्रामुख्याने हे सोने जगात साठ्याच्या बाबतीत पहिल्या क्रमाकांवर असलेल्या अमेरिकेच्या ८९६५ टनाच्या तुलनेत तीन पट अधिक आहे. भारतात आर्थिक उलाढाल उच्चांकी पातळीवर होत आहे. कारण भारतात डीमॅट खात्यांची संख्या १७ कोटीपेक्षा अधिक झाली आहे. देशातील डीमॅट खात्यांची संख्या ही अन्य देशांच्या तुलनेत नवव्या स्थानावर आहे आणि याचा अर्थ डीमॅट खाते रशिया, जपान, इथोपिया, मेक्सिकोसारख्या देशांच्या लोकसंख्येपेक्षा अधिक आणि बांगलादेशच्या लोकसंख्येइतकी आहे. २०२४ मध्ये ३.१४ कोटी नवीन डीमॅट खाते सुरू झाले. गेल्यावर्षी ३.१० कोटी डीमॅट खाते सुरू झाले होते. भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा स्टार्टअप इकोसिस्टम असणारा देश आहे आणि त्यात १,४०, ००० पेक्षा अधिक नोंदणीकृत स्टार्टअप असून दर २० दिवसाला एक युनिकॉर्न अस्तित्वात येत आहे. एक अब्ज डॉलर भांडवल असलेल्या स्टार्टअपला युनिकॉर्न असे म्हटले जाते. जानेवारी ते सप्टेंबर या काळात सहा स्टार्टअप युनिकॉर्न झाले आहेत.

भारतीय तंत्रज्ञान स्टार्टअपने २०२४ च्या पहिल्या सहामाहीत ४.१ अब्ज डॉलरचा फंड गोळा केला आणि तो या सहामाहीच्या तुलनेत ४ टक्के अधिक आहे. निधी गोळा करण्यात भारत चौथ्या स्थानावर आहे. या सकारात्मक आकड्यांत मोदी यांचे व्हिजन 'प्रत्येक हाताला काम' हा संकल्प पूर्ण होताना दिसतो आणि त्याचवेळी 'सब का साथ सब का विकास, सब का विश्वास'चा प्रभाव देखील दिसून येत आहे. जगातील तिसऱ्या

**विनिता शाह**

क्रमांकांच्या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करणाऱ्या भारताने अनेक क्षेत्रात नवनवीन इतिहास रचला आहे. मात्र श्रमशक्तीवर अधिक भर देणे तितकेच महत्त्वाचे आहे. कारण जीडीपीचा आकडा हा देशाच्या सर्वसामान्य नागरिकांच्या समृद्धीचा निकष नाही. विशेष म्हणजे लोकांच्या श्रीमंतीचे मोजमाप त्याच्या उत्पन्नानुसार होते. यात रोजंदारीवर काम करणारे मजूर, नोकरदार वर्ग, महिलांची स्थितीपासून औद्योगिक घराण्यांची कमाई याचा समावेश आहे. असंख्य लोक सरासरीपेक्षा अधिक उत्पन्न घेतात तर अनेक जण तुलनेने कमी.

यंदाची दिवाळी केवळ आनंद देणारी नाही तर सर्वांच्या मनाला उभारी देणारी ठरली आहे. बाजारापासून सामाजिक स्तरांपर्यंत आणि उद्योजकांपासून सरकारपर्यंत सर्वांसाठी दिवाळी समृद्धपणा घेऊन आली. यावेळी बाजारात एकूण ४.२५ लाख कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचा अंदाज आहे. देशातील बहुतांश उद्योजकांनी खरेदी विक्रीचे लक्ष्य गाठले आहे. सरकारला प्रत्येक खरेदी विक्रीतून लाभ झाला आहे. देशात खरेदी विक्रीची वाढती व्याप्ती ही भारताच्या नव्या आर्थिक उंचीचे प्रतीक आहे आणि तेथे गरिबांना देखील आर्थिकदृष्ट्या सबळ करण्याची प्रेरणा देखील आहे. समाजात एक मोठा वंचित घटक असून त्यात खरेदीची क्षमता नाही. प्रत्यक्षात गरिबांना सक्षम करणे हे केवळ सरकारचेच नाही तर बाजाराची देखील जबाबदारी आहे. आधुनिक काळात सरकार लोकांना थेट रोकड देऊन सक्षम करत आहे तर त्याचवेळी बाजाराने देखील लोकांना सक्षम करण्याबाबत विचार केला पाहिजे. भांडवल गोळा करणाऱ्या उद्योजकांनी पैसा केवळ स्वत:वर खर्च करण्याऐवजी गुंतवणुकीसाठी वापरावा. गुंतवणुकीतून रोजगार आणि कामांची निर्मिती होते. ही बाब अधिक महत्त्वाची आहे.

नव्या आर्थिक आघाडीवर यश आणि कीर्ति मिळत असताना धनाढ्य कुटुंबांनी भारतातून निघून जाणे आणि तेथे स्थायिक होणे हे चित्र चिंताजनक आहे. श्रीमंत लोक देशात राहण्याऐवजी परदेशात जाण्यास का प्रवृत्त होत आहेत? परकी भूमीवर आयुष्य व्यतीत करावेसे वाटत असेल तसेच व्यापार करणे, शिक्षण घेणे सोयीचे वाटत असेल तसेच रोजगाराच्या दृष्टीने अधिक सुविधाजनक वाटत असेल तर या गोष्टी नव्या भारतासाठी विचार करावयास लावणाऱ्या आहेत आणि चिंतन करण्यासाठी भाग पाडणाऱ्या आहेत. हेनले प्रायव्हेट वेल्थ मायग्रेशन रिपोर्टच्या एका अहवालात, उच्च गुंतवणूक मूल्य असणारी व्यक्तीगत लोकसंख्या ही २०३१ पर्यंत ८० टक्क्यांच्या उल्लेखनीय वाढीसह होण्याचा अंदाज आहे. ही वाढ भारताला भविष्यातील जगातील भांडवली बाजारातील एक महत्त्वाचा खेळाडू म्हणून सिद्ध करणारी आहे. अर्थात या वाढीला प्रामुख्याने देशांतर्गत सर्वंकष आर्थिक सेवा, आरोग्य सेवा, तंत्रज्ञान क्षेत्रांकडून बळ मिळणार आहे. यात सधन व्यक्ती भारतात परतण्याची स्थिती देखील पाहवयास मिळत आहे. जसजसे जीवनमान उंचावत आहे, तसतसे या आकडेवारीत श्रीमंत व्यक्तींची घरवापसी होण्याचा अंदाज दिसत आहे. मात्र आजघडीला भारतातील कोट्याधीश आरोग्य, शिक्षण, आर्थिक ,राजकीय, प्रशासकीय क्षेत्रात सुधारणा होत असतानाही परदेशात का जात आहेत? हाय नेटवर्थ असणारे (धनाढ्य) आपले देशवासीय देश सोडून अन्य ठिकाणी जाणे आणि तेथे स्थायिक होण्यासंदर्भातील जारी झालेला अहवाल बऱ्याच गोष्टी सांगणारा आहे. जगभरातील निधी आणि गुंतवणुकीच्या ट्रेंडवर लक्ष ठेवणाऱ्या कंपनीच्या या वार्षिक अहवालात अति श्रीमंत भारतीय गाशा गुंडाळून परदेशात स्थलांरित होण्याची शक्यता या अनेक प्रश्नाला जन्म घालतात. सरकारने या प्रश्नांवर विचार करणे गरजेचे आहे. देशातील धनाढ्य लोकांनी सुजलाम सुफलाम असणाऱ्या भूमीवर आपल्या श्रीमंतीतून विकासाचे नवे संकल्प कार्यान्वित करणे आणि देशाला त्याचा लाभ मिळवून देण्याऐवजी परदेशाला फायदा मिळवून देण्यामागचे कारण काय असावे? या कारणांची यादी मोठी आहे.

अशांतता, दहशतवाद, किचकट कायदे व्यवस्था, हिंसाचारांचा आगडोंब असणे? यामागे आणखी एक कारण. प्रशासनाला वेठीस धरणारे, सत्ताकेंद्र निर्माण करणारे आणि खुर्चीत चिटकून राहणारे राजकीय व्यक्ती हे लोकशाही मार्गाने मिळालेल्या अधिकारांचा गैरवापर करत लोकशाहीचे कंबरडे मोडण्याचे काम करत आहेत. या मंडळींनी कृषीप्रधान देशाला 'खुर्चीप्रधान' देश केला. सरकार आहे,पण प्रशासन नाही. कायदा आहे, पण न्याय नाही. भ्रष्टाचाराच्या दलदलीत राष्ट्रीय हित हरवले आहे. मोठ्या संख्येने स्थलांतरांच्या उंबरठ्यावर असलेल्या देशाला वाचविण्यासाठी राजकीय नेत्यांनी स्वत:ची संकुचित मनोवृत्ती सोडून द्यायला हवी. तरच श्रीमंत किंवा प्रतिभावंत व्यक्ती आपल्या देशात सुखाने, समाधानाने आणि संतुलीत जीवनाचा आनंद घेतील आणि निघून जाण्याच्या विचारातून बाहेर पडेल.

---

# नापास आवताडे आणि उदासीन भालके!

**संभ्रमाच्या वातावरणात निवडणुकीची 'दशा आणि पुढची दिशा':**
गेल्या तिन्ही निवडणुकींपेक्षा यंदाची ही निवडणूक बऱ्याच अर्थाने वेगळी आहे. ही निवडणूक पक्षनिष्ठा , स्वामिनीष्ठा, विचारधारा , तत्व या सगळ्यांना तिलांजली देत प्रत्येकाने प्रत्येकाच्या अहंकारासाठी लढवली जात असलेली निवडणूक आहे. त्यामुळे महाराष्ट्रातीलच एकूण निवडणुकांचे चित्र काय असेल याबाबत कमालीचा संभ्रम आहे. सोलापूर जिल्ह्यात देखील पक्ष त्यांच्या आघाड्या युती यामध्ये एकमेकांविषयी परस्पर विश्वासघात झाल्यामुळे कुठल्याही गटाचे निश्चितपणाने मोजमाप करता येत नाही. कुठल्याही विचाराचा गटाचा पगडा मानून आपण काम करावे , पक्षनिष्ठा आणि स्वामिनीष्ठेशी इमान राखून आपण काम करावे अशी परिस्थिती राहिली नाही. एकीकडे ही लोकशाहीची निवडणूक असली तरीही एक प्रकारे धर्मयुद्ध आहे असे चित्र सर्वच प्रादेशिक आणि राष्ट्रीय पक्षांनी उभे केले आहे. पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात तर ही वेळ कमालीची उसवली आहे. पंढरपूरवर अवलंबून असणाऱ्या मोहोळ, माढा, सांगोला या मतदार संघात देखील त्यामुळे प्रचंड संदिग्धता आहे.

**पांडुरंग विठ्ठल परिवाराची वीण उसवली :**
पांडुरंग परिवार आणि विठ्ठल परिवार हे येथील परंपरागत विरोधक असले तरी यंदा हे दोन्ही परिवार अनेक ठिकाणी एक आहेत तर अनेक ठिकाणी याच परिवारातील अंतर्गत लाथाळ्या एकमेकांचे खच्चीकरण करण्यासाठी हमरी-तुमरीवर आले आहेत.
प्रशांत परिचारक यांनी मागील निवडणुकीत भाजपाच्या आग्रहाखातर त्याग केला आणि समाधान आवताडे यांना आपला बसण्याचा पाट दिला . भाजपा पक्षश्रेष्ठींनी त्यावेळी , प्रशांत परिचारक यांच्याबद्दल जनमत अनुकूल नाही, तुमची उमेदवारी सेफ नाही, ही जागा आपण गमवू असे स्पष्टपणे सांगून समाधान आवताडे यांच्या पाठीमागे ताकद उभा करण्यास भाग पाडले.

**अवताडे यांचे कारनामे :**
अवताडे यांनी पंढरपुरात लक्ष घालायचे नाही, परिचारक यांच्या विरोधी भूमिका घ्यायची नाही, त्यांच्या सल्ल्याने - समन्वयाने राजकारण करायचे या सर्व अलिखित अटी शर्ती झाल्या आणि अवताडे अगदी थोडक्या मतांनी आमदार झाले. पहिल्या वर्षभर गुण्यागोविंदाने प्रत्येक गोष्टी समाधान मानून घेणाऱ्या अवताडे यांनी वर्षभरानंतर मात्र आपली असमाधानी वृत्ती प्रकट करत परिचारकांना प्रचंड ठुसण्या मारल्या. शहरात स्वतंत्र गट करायचा प्रयत्न केला, कार्यालय थाटले, तेथून परिचारक विरोधी कुरघोड्या सुरू केल्या, मंगळवेढ्यात दामाजी कारखान्यात त्यांना विरोध केला .
हे सगळे राजकारण करत असताना अवताडे यांना परिचारकांना खाली दाबून आपले वर्चस्व प्रस्थापित करणे जमले नाही. परंतु दरम्यान महाराष्ट्रात मनोज जरांगे पाटील आणि एकूणच मराठा - मराठेतर राजकारणाच्या वाऱ्यामुळे , ग्रामीण महाराष्ट्रातील विद्यमान मराठा आमदार बदलायचे नाहीत हे भाजपचे धोरण ठरले आणि अवताडे यांनी पुन्हा एकदा स्वाभाविकपणे पंढरपूर मंगळवेढ्यावर आपला दावा ठोकला. परंतु ज्यावेळी सर्वात मोठी अडचण होती ती परिचारकांची . तरीही त्यांनी त्यांचा विरोध न जुमानता आपला प्रचार सुरू ठेवला. व्यवस्था चालू केली , परंतु परिचारकांच्या सहकार्याशिवाय आपल्याला मते मिळणार नाहीत हे लक्षात आल्यामुळे पुन्हा भाजप पक्षश्रेष्ठींच्या मध्यस्थीने यामध्ये एक मोठा हाय व्होल्टेज ड्रामा केला. परिचारकांनी, कमळाला मत मागणार नाही म्हणत फिरून फिरून स्वतःचा प्रचारही सुरू केला. पुन्हा भाजपा पक्षश्रेष्ठींचा ड्रामा झाला. अखेर सो कॉल्ड त्याग, विश्वास , पक्षनिष्ठाचे गोडवे गात परिचारकांनी माघार घेतली.

**पंतांचा कार्यकर्ता :**
पण एकदा घरात घुसून पाठीवर वार केलेला शत्रू पुन्हा जगता येत नाही म्हणून पुढे येऊन दयापात्र घेऊन उभारला तरी त्याला उंबऱ्याच्या आत पुन्हा घ्यावे का ? हे कळण्याइतपत कार्यकर्ता सजग होता , म्हणून त्यांनी अवताडे यांच्या उमेदवारीला विरोध केला.
आपलेच नाणे खोटे असेल तर आपण बाजारात फार खणखणाट करू शकत नाही , याची पूर्ण जाणीव परिपक्व राजकारणी असलेल्या परिचाराकांना आहे. कोशातले परिचारक प्रदक्षिणा मार्गावर होते तोपर्यंत थोडेफार माणसात तरी होते , आता बंगल्यात गेल्यावर ते माणसातूनही उठून जातील अशी भीती कार्यकर्ते व्यक्त करीत असताना त्यांना मात्र 'वॉटर फ्रंट' चा आलिशान बंगला, त्यावरील हिरवळीचा मोह सुटत नाही. हाच लावाजवा सांभाळण्याकरिता अर्बन बँक, युटोपियन यांच्या काही गोष्टी कराव्या लागल्या ज्यामुळे आपल्या नाड्या भाजप पक्षश्रेष्ठींच्या हाती गेल्या. त्यामुळे पुन्हा एकदा अवताडे यांचे भूत त्यांना मानगुटीवर घ्यावे लागले. सुधाकरपंत परिचारक यांच्या विचाराशी प्रामाणिक असणारा परिचारक गटाचा कार्यकर्ता अवताडे यांना मत देणार नाही असे दिसते.



**प्रशांत परिचारकांचे व्हिजन :**
पण कार्यकर्ता हा गुलाम नाही तर तो स्वाभिमानी असतो. हे परिचारक विसरले. परिचारकांचा एक मोठा कार्यकर्ता वर्ग आज राष्ट्रवादीचे उमेदवार अनिल सावंत यांचे प्रमुख प्रचारक आहेत तर अनेक कार्यकर्ते हे दिलीप धोत्रे यांचा उघड उघड प्रचार करीत आहेत. मंदिर परिसरातील त्यांच्या समाजाचे - गटाचे कार्यकर्ते उघडपणे अवताडे विरोध करीत असताना दिसतात. तर काहीजण भारत भालके यांच्या भावविश्वात रमत पुन्हा भगीरथ यांच्याशी जोडले गेले आहेत.
पण प्रशांत परिचारक हे जर विधानसभेतील आमदार झाले आणि आत्ता सारखा तीन, पाच सहा हजार कोटीचा निधी जर मिळणार असेल तर प्रशांत परिचारक या एकट्या नेतृत्वात आणि त्यांच्या व्हिजनमध्ये संपूर्ण मतदारसंघाचा कायापालट करण्याची शक्ती आहे हे निश्चित.

**अवताडे पंढरपुरात निष्क्रिय :**
समाधान आवताडे हे जरूर कर्तृत्व सम्राट असतील परंतु पंढरपूर शहराच्या बाबतीत ते अत्यंत निष्क्रिय आमदार ठरले . आजही पंढरपूर एसटी स्टँड पासून ते विठ्ठल मंदिरापर्यंत साधी मुतारी देखील त्यांना उभी करता आली नाही. शहरातील एकही रस्ता असा नाही की ज्या रस्त्यावरती खड्डे नाहीत. काही रस्त्याचे फक्त फलक आहेत तेथे रस्ताच बांधला गेला नाही. कार्यकर्ता जवळ आला की त्याला ठेकेदार करायचा आणि आपल्या आर्थिक बेड्यांमध्ये अडकून त्यांला झेंडा नाचवायला लावायचे , या पलीकडे त्यांच्या राजकारणाच्या दृष्टी कधी गेली नाही. त्यापेक्षा त्यांचे बंधू संजय मालक अवताडे यांनी , ' दिलेला शब्द पाळायचा ' ही प्रतिमा उभी केली आणि शेकडो कार्यकर्ते जोडून ठेवले. परंतु तो प्रामाणिकपणा समाधान आवताडे यांना कधीच अंगी बानवता आला नाही .

**संधीचे सोने नाही माती केली :**
भारतीय जनता पक्षाने भरभरून दिले. प्रचंड निधी दिला, व्हिजन मांडण्यासाठी, आराखडे मांडण्यासाठी वेळ दिला, व्यासपीठ उपलब्ध करून दिले . स्वतः मुख्यमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस यांच्यापासून ते नीलमताई गोरे पर्यंत सगळ्यांनी अक्षरशः पंढरपूरच्या विकासासाठी प्रचंड तळमळ दाखवली . परंतु या लोकप्रतिनिधींना त्याचे सोने करता आले नाही. भाजपाबद्दल नितांत श्रद्धा आहे , आदर आहे आणि भाजपा हाच राज्याचा विकास करू शकतो याबाबत शहरी लोकांच्या मनामध्ये संदेह नाही , परंतु त्यांना अवताडे यांचे नेतृत्व मान्य नाही. परिचारक यांनी केवळ बसायचा पाट दिला नाही तर आपले घर देऊन टाकले . खूप मोठी किंमत मोजून त्यांना ते घर परत मिळवावे लागेल . म्हणून परिचारकांच्या स्वाभिमानाकरिता अवताडेंना घरी बसवायचे असा ठाम मतप्रवाह आता परिचारक समर्थकांमध्ये आहे. तीन वर्षात जो परिचाराकाना गप्प करू शकतो, पक्षश्रेष्ठींचा दबाव आणू शकतो, तो पाच वर्षात परिचारक गट नेस्तनाबुत करेल अशी भीती या समर्थकांना आहे. शहरी भागात फडणवीस शिंदे यांचे प्रतिमा आणि भाजपबद्दल आपुलकी असली तरी ग्रामीण भागात भाजपाच्या प्रचंड विरोधात वातावरण आहे. शेताच्या हमीभावापासून ते २४ तास पाणी आणि सोलरच्या पाणी पंप याबाबतचे आश्वासने अनेक वर्षांपासून ग्रामीण जनता ऐकत आहे.

**अनिरुद्ध बडवे**

**शहरात आनंद ग्रामीणमध्ये शिमगा :**
लोकसभेच्या निवडणुकीत , अभिजीत पाटील यांचे खच्चीकरण करून एका दिवसात त्यांना पाठिंबा वळवायला लावला हे प्रचंड दबावाचे राजकारण ग्रामीण भागाला अजिबात आवडलेले नाही. व्यक्तीच्या अभिजीत पाटील यांच्याबद्दल अनेकांना स्वारस्यचे नसले तरी भाजपाचा हा स्वभाव आणि दबावनीती लोकांच्या मनात घर करून आहे. याचाच विरोध म्हणून प्रणिती शिंदे यांना तब्येत ४० हजाराहून अधिक मताधिक्य दिले गेले विधानसभेत देखील समाधान आवताडे आणि प्रशांत परिचारक यांच्याबाबत भाजपाने हेच धोरण अवलंबले आहे याचाही राग केवळ परिचारक समर्थकांत नाही तर सामान्य जनतेमध्ये देखील आहे. तथापि पुन्हा महायुतीचे हात बळकट करण्याकरिता अवताडे यांना मतदान होईल का हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

**भगीरथ फक्त पुण्याईचा धनी :**
दुसरीकडे भगीरथ भालके यांना भारत नाना यांच्या पुण्याईच्या पलीकडे काहीही कमावता आले नाही. खूप मोठा काळापर्यंत ते नॉट रिचेबल राहिले. ज्येष्ठ श्रेष्ठ कार्यकर्त्यांचाच ते फोन उचलत नाही तर सामान्य नागरिकांचा कधी उचलणार ? विठ्ठल कारखाना हातचा घालवला, अर्जुन बँकेच्या संभ्रमाचे भूत आणखीही लोकांच्या समोर आहे , कुठल्याही पक्षनेत्याचा ठाम विश्वास त्यांना आजही सार्थ करता आला नाही . विरोधक असलेल्या विठ्ठल परिवाराची एकत्रित मोळी जोडून एक महाशक्ती उभे करण्याची मोठी संधी त्यांनी घालवली. परंतु कॉंग्रेसने भगीरथ भालके यांना उभे करून वेगळे समीकरण साधण्याचा प्रयत्न केला.

**उमेदवारीचा मेलो ड्रामा :**
त्यांनी शरद पवारांची भेट घेतली . पुन्हा त्यांनी फोन स्विच ऑफ केला . पवारांना त्यांनाच उमेदवारी द्यायची होती पण त्यांनी घेतली नाही ...... वगैरे वगैरे चर्चा झाल्या.
परंतु शरद पवार हे किती विश्वासघातकी प्रतिमेचे नेते आहेत हे महाराष्ट्राला माहित आहे . जर भगीरथ हेच निवडून येणारे असतील आणि त्यांनाच उमेदवारी द्यायची असेल तर मग महाविकास आघाडीची एकत्रित लढत त्यांनी का नाकारली ? शेवटपर्यंत त्यांनी उमेदवारी जाहीर केली नाही . त्याचवेळी प्रशांत परिचारक हे राष्ट्रवादीच्या संपर्कात आले . जयंत पाटील हे परिचारक यांना उमेदवारी देण्यासाठी उत्सुक होते. जर परिचारक यांनी तुतारी घेतली असती तर भगीरथ भालके हे कुठेच राहिले नसते . त्यामुळे किमान कॉंग्रेसचे उमेदवारी निश्चित करून निवडणुकीच्या रिंगणात तरी उभे राहू असे गणित त्यांनी मांडले. वास्तविक पाहता ज्या हट्टाने प्रणिती शिंदे यांनी उमेदवारी आणली त्याच हट्टाने त्यांनी महाविकास आघाडीमध्ये शिष्टाचाराने ही जागा सोडवून घ्यायला हवी होती . ही जबाबदारी व्यक्तीशः प्रणिती शिंदे यांची होती .

**सावंत : राष्ट्रवादीचा नवा बकरा :**
अनिल सावंत हे एक चांगले व्यक्ती आणि संस्था , त्याची शक्ती राष्ट्रवादीच्या जवळ येते आणि त्या निमित्ताने तुतारीचा गट जिवंत राहतो यासाठी केवळ या भल्या माणसाचा बळी देण्याची रचना शरद पवार, जयंत पाटील यांनी केली. या निमित्ताने भालके यांच्यावरील मोहिते पाटील यांचा राग देखील व्यक्त झाला त्यांनाही सन्मान दिला बाकी . आर्थिक व्यवहार देखील जुळून आले आपल्या नावावर जगणारी मलिदा गँग देखील काही दिवस जगती राहील , हे सर्व विचार करण्यात आले. परंतु अनिल सावंत जर सातत्याने सक्रिय राहिले तर या मतदारसंघात त्यांचा एक स्वतंत्र झेंडा , स्वतंत्र गट निर्माण होऊ शकतो

**नवा नेता : नवी आशा**
भगीरथ भालके हे आमदार झाल्यानंतर फार काही भव्य दिव्य करतील अशी आशा नाही , आमदारकी मिळाल्यावर त्यांनी संपर्कात राहावं ही तरी लोकांची किमान अपेक्षा आहे. परंतु अवताडे यांची एकदा परीक्षा घेतली आहे . त्या परीक्षेत ते नापास झाले आहेत , अशावेळी नवी संधी देऊन एकदा भालके यांना मतदान करावे असा एक ट्रेंड आहे.
भारत भालके जेव्हा आमदार झाले तेव्हा तरी ते कुठे परिपक्व होते ? पहिल्यांदा विधानसभेत गेल्यावर हा पैलवान गडी वाक्यातुर्याच्या पलीकडे काही करत नव्हता पण हळूहळू नाना ते सर्व डाव शिकले आणि सामान्य माणसाला प्रतिष्ठा देत अनेक योजनांना त्यांनी निधी आणला. हे तालुक्याने पाहिले आहे .
त्यामुळे भगीरथ भालके देखील शिकतील, समजतील, समर्थ नेतृत्व देतील अशी अशा त्यांच्या समर्थकांना आहे. पंढरपूर शहरासह मंगळवेढ्यात देखील त्यांनी बऱ्यापैकी जम बसविण्याचा प्रयत्न केला आहे. दामाजी कारखान्यावेळी अवताडे यांना शह देत परिचारकांशी मनोमिलन करत त्या कारखान्याला संकटातून बाहेर आणण्यासाठी त्यांनी परिचारकांना साथ दिली. गेल्या साडेतीन वर्षात एक प्रबळ विरोधक म्हणून ते उभा राहू शकले नाहीत. परंतु किमान अनेक योजनांबाबत पाठपुरावा करण्यात त्यांनी स्वारस्य दाखविले. त्यांना यश आले नाही, पण त्याचे प्रयत्न देखील ते जाहीरपणाने आणि आवाज मोठा करून सांगू शकले नाहीत. त्यांच्या पत्नी प्रणिता काही अंशी अधिक सरस आहेत त्यांची बोलण्याची , वागण्याची , समोरच्याचे समजून घेण्याची आणि त्यावर व्यक्त होत प्रत्येक प्रश्नाला सामोरे जाण्याची त्यांची प्रवृत्ती हे भारत नानांच्या स्वभावाला साजेशी आहे. परंतु त्यांचे नेतृत्व पुढे येण्याच्या दृष्टिकोनातून भगीरथ त्यांना साथ देतील का ? हा खरा यक्षप्रश्न आहे . या सर्व पार्श्वभूमीवर पंढरपूर आणि मंगळवेढेकर पुन्हा समाधान आवताडे यांना साथ देतात का ? भगीरथ भालके नावाच्या नेतृत्वावर शिक्का मोर्तब करतात ? हे पाहूयात

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

## "काँग्रेसवाले निवडणुकीपुरतं आश्वासन देतात"

# देवेंद्र फडणवीस यांचा हल्लाबोल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**वर्धा :** विधानसभेच्या निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे अनेकांचे लक्ष लागलेलं आहे. काही दिवसांपासून सर्वच पक्षांचा जोरदार प्रचार होता. प्रचारासाठी दिल्लीतील दिग्गज नेत्यांनीही विविध मतदारसंघात प्रचारसभा घेतल्या. काल (१८ नोव्हेंबर) निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा होता. त्यामुळे राज्यभर अनेक नेत्यांच्या सभा पार पडल्या. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची काल आर्वीमध्ये जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. काँग्रेसवाले निवडणुकीपुरतं आश्वासन देतात आणि निवडणुकीनंतर त्यांची आश्वासनं संपून जातात, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली.

"विधानसभेच्या निवडणुकीची शेवटची प्रचारसभा घेण्यासाठी मी आर्वीमध्ये आलो. २३ तारखेला निकाल आल्यानंतर पुन्हा एकदा महायुतीचं सरकार येणार हे काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे. लोकांना माहिती आहे की काम करणारे कोण आहेत? आपण नमो किसान योजना आणली. आता पुन्हा तुमचा आशीर्वाद मिळाला तर १२ हजार नाही तर १५ हजार या योजनेच्या माध्यमातून आपण देणार आहोत. तसेच हमी भावापेक्षा जेव्हा कमी भाव शेतकऱ्यांना मिळेल तेव्हा दोन्ही मधला फरक आपलं सरकार देईन", असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.



"राज्यातील निवडणुकीच्या प्रचारासाठी काल परवा राहुल गांधी आले होते. त्यांनी म्हटलं की त्यांचं सरकार आलं तर सात हजार रुपये देऊ. त्यानंतर मी थेट मल्लिकार्जुन खर्गे यांच्या गावात फोन केला आणि विचारलं तुमच्याकडे सोयाबीनचा दर काय? तेव्हा मला माहिती मिळाली की ३८०० रुपये आहे. त्यामुळे लक्षात ठेवा लबाडाचं अवतन जेवल्याशिवाय खरं नसतं. हे काँग्रेसचे लोक खोटे आहेत. निवडणुकीपुरतं आश्वासन देतात आणि निवडणुकीनंतर त्यांची आश्वासनं संपून जातात. मात्र, जनतेचा विश्वास आमच्या पाठिशी आहे", असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला.

"लाडक्या बहिणींनो मला तुम्हाला सांगायचं आहे की जसं आम्ही तुमचे सख्खे भाऊ आहोत, तसं महाविकास आघाडीवाले तुमचे सावत्र भाऊ देखील बाहेर फिरत आहेत. आता तुम्हाला जनसामान्यांचे नेते पाहिजेत की घराणेशाहीचे नेते हवे आहेत? हे आता तुम्हाला ठरवायचं आहे", असं म्हणत फडणवीस यांनी आघाडीवर हल्लाबोल केला.

## » Selected

### ३७ मतदान केंद्रे सुरक्षित ठिकाणी हलवणार

**गडचिरोली** : येत्या २० नोव्हेंबरला होणारी विधानसभा निवडणूक शांततेत पार पडावी, यासाठी गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलदृष्ट्या अतिसंवेदनशील असलेली ३७ मतदान केंद्रे सुरक्षित ठिकाणी स्थानांतरीत करण्यात येणार आहेत. २०१९ च्या निवडणुकीत नक्षल्यांनी मतदान पथकांना लक्ष्य केले होते; परंतु यंदा सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत पोलिसांच्या योग्य नियोजनामुळे नक्षल्यांचे मनसुबे उधळून लावले गेले. लोकसभा निवडणुकीप्रमाणेच विधानसभा निवडणूकही शांततेत पार पडावी, यासाठी पोलिस विभाग प्रयत्नशील आहे. दोन दिवसांपूर्वीच नक्षल्यांनी भामरागड तालुक्यात पुलाखाली लपवून ठेवलेली स्फोटके जप्त केली होती. त्यामुळे पोलिस यंत्रणा अधिक सतर्क झाली आहे.

### वीजतज्ज्ञ प्रताप होगाडे यांचे निधन

**कोल्हापूर** : महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष, ज्येष्ठ वीजतज्ज्ञ आणि समाजवादी पार्टीचे प्रदेश कार्याध्यक्ष प्रतापराव होगाडे यांचे आज सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.



त्यांची राजकीय कारकिर्द जनता दलातून सुरू झाली होती, त्यांची बरीचशी कारकिर्द ही जनता दलातच गेली होती. अभियांत्रिकीचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी सामाजिक कार्याला सुरूवात केली होती. उमेदीच्या काळात त्यांनी इंचलकरंजी को ऑपरेटिव्ह सिमेंट कंपनी, साधना सहकारी बँक, इचलकरंजी टेक्सस्टाईल, प्राईड इंडिया टेक्सस्टाईल पार्क आदी विविध सहकारी संस्थांची स्थापना केली. जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीत त्यांनी सक्रीय सहभाग घेतला होता, त्यानंतर त्यांनी जनता दलाच्या माध्यमातून राजकीय क्षेत्रात प्रवेश करुन विविध विषयावर आंदोलने केली होती. जनता दलाचे प्रदेश उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. त्यानंतर जनता दलात प्रदेश कार्याध्यक्ष, प्रधान महासचिव अशी विविध पदे त्यांनी भूषविली. जनता दलाच्या वतीने त्यांनी इचलकरंजी विधानसभा मतदारसंघातूनही निवडणुक लढवली होती. काही महिन्यांपूर्वीच त्यांनी समाजवादी पक्षात प्रवेश केला होता, समाजवादी पक्षाने त्यांच्यावर प्रदेश कार्याध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली होती. आज (मंगळवारी) सकाळी दहा वाजता इचलकरंजी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

### कापड दुकानात चार लाखांची चोरी

**पुणे** : पुणे जिल्ह्यातील केसनंद ग्रामपंचायतीच्या शेजारी असणाऱ्या कापड दुकानामध्ये मध्यरात्री सुमारास चोरीची घटना घडली आहे. यात चोरट्यानी तब्बल तीन लाख ८० हजारांची रोकड लांबविली आहे. याप्रकरणी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सागरमल माली यांचे केसनंद गावात बालाजी टेक्सटाईल्स नावाने दुकान आहे. रात्री माली हे दुकान बंद करून घरी गेले होते. दरम्यान मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी दुकानाचे शटर उचकटून दुकानातील गल्ल्यामध्ये असलेली तीन लाख ८० हजारांची रोकड लांबवली. हा प्रकार सकाळी उघडकीला आला. यानंतर माली यांनी पोलिसांना या घटनेची माहिती दिली.

## उद्धव ठाकरे यांची टीका

# "गरीब, श्रीमंतात दरी पाडण्याचे भाजपचे पाप"

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**कर्जत :** भाजप सध्या 'बटेंगे तो कटेंगे'चा नारा देत आहे; पण येथे कुणीच बटणार नाही किंवा कटणार नाही. उलट या लोकांनीच देशात गरीब व श्रीमंत अशी दरी पाडण्याचे पाप केले. मी मुख्यमंत्री असताना कोण कटले? मी सर्वांना सोबत घेऊन पुढे जात होतो; पण त्यांनी गद्दारी करून सरकार पाडले. आता हे लोक आपल्या नोकऱ्या आणि उद्योग गुजरातला पळवण्याचे काम करतात. २३ तारखेनंतर राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे. आता जा तिकडेच ढोकळा खायला, अशा शब्दांत शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि महायुती सरकारवर आसूड उगारला.

कर्जत येथे आयोजित प्रचारसभेत ते म्हणाले, की या लोकांनी जनतेला धोके देऊन स्वतःला खोके घेतले. त्यांच्याकडे विकासाचा कोणताही हिशेब नाही. राज्यातील ज्या-ज्या ठिकाणी गद्दारी झाली, त्या ठिकाणी हेच चित्र आहे. या मतदारसंघांत अनेक कंत्राटे देण्यात आली. सरकारच्या



तिजोरीतून पैसा देण्यात आला; पण तो शेवटच्या घटकापर्यंत पोहोचलाच नाही. आता ५० खोके यांच्यासाठी सुटे पैसे झाले. या लोकांनी हजारो कोटींनी महाराष्ट्र लुटला आहे.

या निवडणुकीत पैशाचा महापूर आला आहे. माझ्या उमेदवारांकडे तेवढे पैसे नाहीत. शिवसैनिकांनी आपल्या निष्ठेचा खडक त्यात वाहून जाऊ देऊ नये. महापूर येतो आणि जातो; पण पैसे घेऊन मते विकत घेणारी ही औलाद महाराष्ट्राला काय सुख देणार? या लोकांनी ठिकठिकाणी जाहिरातबाजी सुरू केली आहे. केलेय काम भारी, लुटली तिजोरी. केली गद्दारी, पुढे लाचारी, असे ठाकरे म्हणाले.

## कसारा घाटात झालेल्या अपघातात ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले

# कसाऱ्याजवळ भीषण अपघात, चार ठार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**ठाणे :** मुंबई-नाशिक महामार्गावरील कसारा घाट ते उंबरमाळी दरम्यान रविवार रात्रीपासून सोमवार सकाळपर्यंतच्या अवघ्या १५ तासात ४ अपघात झाले. या अपघातात चार ठार, तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. चारपैकी तीन अपघात हे मुंबई- नाशिक महामार्गावरील ठेकेदार कंपनीच्या बेजबाबदारपणामुळे झाल्याचे समोर आले असून एक अपघात दुचाकी स्लीप झाल्यामुळे घडला आहे.

मुंबई-नाशिक महामार्गावरील कसारा घाटातून रविवार (दि.१७) रात्री ९ च्या सुमारास नाशिकहून मुंबईच्या दिशेने दुचाकीवरून जात असताना दुचाकी एका गतिरोधकावर आदळली व दुचाकीस्वाराचा ताबा सुटून दुचाकी थेट कसारा घाटातील दरीत कोसळली. या अपघातात दिनेश साहू व उत्तम उंबरकर हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यानंतर काही वेळातच उंबरमाळी जवळील पेठ्याचा पाडा या फाट्यावर पेठ्याचा पाड्यातील दोन तरुण दुचाकीवरून महामार्ग ओलांडून घरच्या रस्त्याकडे जात असताना एका अज्ञात ट्रकने पाठीमागून धडक दिली. त्यामुळे दुचाकीवरील अनिल पारधी व बाळू झुगरे हे रस्त्यावर पडले. या अपघातात अनिल पारधी याचा जागीच मृत्यू झाला तर बाळू झुगरे याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

रविवारी मध्यरात्री १ वाजून ४० मिनिटांनी कसारा घाटाच्या पायथ्याशी पोहचलेल्या दूध टँकरचा ब्रेक फेल झाल्याने चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले. टँकर थेट पलटी होऊन २०० फूट खाली कोसळला. या



### ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे अपघात

- कसारा घाटातील अपघात व कसारा गावाजवळील अपघात हा मुंबई-नाशिक महामार्गावर दुरुस्तीचे व उड्डाणे पुलाचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीमुळे झाल्याचे बोलले जात आहे. कसारा घाटात तीव्र उत्तार व वळणदार रस्त्यावर मोठे गतिरोधक टाकण्यात आले आहेत. त्यामुळे वाहनचालक भरधाव वेगात असताना त्यांना गतिरोधकाचा अंदाज येत नाही. त्यामुळे गतिरोधकवर वाहने एकमेकांवर आदळून अपघात होत आहेत.

अपघातात मधुकर नायकवाडी (रा. संगमनेर) याचा जागीच मृत्यू झाला आहे. चौथ्या अपघात सोमवारी (दि.१८) सकाळी साडेअकराच्या सुमारास नवीन कसारा घाटात झाला.

# देश सुरक्षित ठेवण्यासाठी महायुतीसोबत राहा- योगी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**कराड :** मोदी सरकारच्या नेतृत्वाखालील महायुतीला साथ देऊन मनोज घोरपडे यांना विधानसभेत पाठवा, असे आवाहन उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मसूर येथील सभेत केले. मोदींच्या नेतृत्वाखाली आज देश, देशाच्या सीमा व धर्म सुरक्षित आहे. ही सुरक्षितता कायम ठेवण्यासाठी महायुतीसोबत राहा. असे आवाहनही त्यांनी केले.

कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार मनोज घोरपडे यांच्या प्रचाराच्या सांगता सभेत योगी आदित्यनाथ बोलत होते. उमेदवार मनोज घोरपडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, विक्रम पावसकर, मकरंद देशपांडे,



रामकृष्ण वेताळ, विठ्ठल स्वामी महाराज, सुंदरगिरी महाराज, नीळकंठ धारेश्वर महाराज, सचिन नलवडे, विक्रमबाबा कदम, प्रमोद गायकवाड, सीमा घार्गे, दीपाली खोत, सुनील काटकर, संग्राम घोरपडे, महेशबाबा जाधव, वासुदेव माने, चित्रलेखा माने, संपतराव माने, भीमराव पाटील, विजयागिरी मल्लीग महाराज व मान्यवर उपस्थित होते.

# जळगावात अपक्ष उमेदवाराच्या घरावर गोळीबार; तिघांना अटक



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जळगाव :** जळगाव शहर मतदारसंघातील अपक्ष उमेदवार अहमद हुसेन शेख यांच्या घरावर गोळीबार झाला आहे. मेहरुण परिसरात सोमवारी पहाटे ४ वाजेच्या सुमारास अपक्ष उमेदवार अहमद हुसेन यांच्या घरावर अज्ञातांकडूनतीन राउंड फायर करण्यात आले आहेत. या घटनेत शेख यांच्या घराच्या खिडकीच्या काचा फुटल्या असून सुदैवाने कोणालाही दुखापत झालेली नाही. या घटनेनंतर जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्यासह अन्य वरिष्ठ पोलिस अधिकारी व कर्मचारी दाखल झाले. याशिवाय अहमद हुसेन यांचे समर्थकही घटनास्थळी हजर झाले होते. पोलीस घटनास्थळी पोहोचले असता त्यांना तीन रिकामी काडतुसे आढळून आली.

दरम्यान, एमआयएमचे माजी जिल्हाध्यक्ष अहमद हुसेन शेख हे विधानसभा निवडणुकीमध्ये जळगाव शहर मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहेत. सोमवारी (१८ नोव्हेंबर) पहाटे घरातील सर्वजण साखर झोपेत असताना अज्ञात दोन दुचाकीस्वारांनी त्यांच्या घरावर तीन राऊंड फायर केले. यात त्यांच्या घराच्या खिडकीच्या काच फुटल्या आहे.

याप्रकरणी गोळीबार करणाऱ्यांचा पोलिसांकडून शोध घेतला जात आहे. जळगाव जिल्ह्यात याआधीही मुक्ताईनगर बोदवडमधून निवडणूक लढणारे उमेदवार विनोद सोनवणे यांच्या वाहनावरही गोळीबाराची घटना घडली होती. या प्रकरणी गोळीबार करणाऱ्या तीन संशयित आरोपींना अटक करण्यात आली होती.

## येवल्यात शक्तीप्रदर्शन...

पंढरी संचार छायाचित्रसेवा




**येवला :** येवल्यातील प्रचाररॅलीदरम्यान राषट्रवादी काँग्रेसचे उमेदवार छगन भुजबळ यांना क्रेनद्वारे भव्य पुष्पहार अर्पण करण्यात आला. या रॅलीने प्रचाराची सांगता झाली.

# "जरांगे हा हिंदुत्व तोडण्यासाठी निघालेला राक्षस"- कालिचरण महाराज

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**संभाजीनगर :** राज्यात मराठा आरक्षणासाठी आंदोलक मनोज जरांगे यांनी मोठ्या प्रमाणात लढा दिला. दरम्यान, याच आंदोलक मनोज जरांगे यांच्यावर कालिचरण महाराज यांनी सडकून टीका केली आहे. "मनोज जरांगेला जातीच्या आरक्षणाशी काहीही



देणेघेणं नाही. जरांगे हा हिंदुत्व तोडण्यासाठी निघालेला राक्षस आहे," अशी जहरी टीका त्यांनी केली आहे. मराठवाड्यात लोकसभा निवडणुकीत महायुतीला मराठा आरक्षण आंदोलनाचा जोरदार फटका बसला होता.

या पार्श्वभूमीवर रविवारी कालीचरण महाराज यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये शिंदे गटाचे उमेदवार संजय शिरसाट यांच्यासाठी प्रचारसभा घेतली.

## पंकजा मुंडेंचं मिश्किल वक्तव्य

# "खासदार व्हायला गेले आणि आमदार झाले"

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**परळी :** राज्यात काल विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची सांगता झाली. महिनाभरापासून सर्वपक्षीय नेतेमंडळींकडून या निवडणुकीसाठी जीवाचे रान करून प्रचार करण्यात आला. दरम्यान, याच पार्श्वभूमीवर काल परळीत महायुतीची प्रचार सभा आयोजित करण्यात आली होती . या सभेत भाजपच्या सरचिटणीस आणि विधानपरिषदेच्या आमदार पंकजा मुंडे यांनी केलेलं एक वक्तव्य सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचं कारण बनलं आहे.

परळीचे विद्यमान आमदार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार) या विधानसभा



मतदारसंघातील अधिकृत उमेदवार (महायुती) धनंजय मुंडे यांच्या प्रचारार्थ प्रचारसभा आयोजित करण्यात आली होती. पंकजा मुंडे यांनी या प्रचारसभेला संबोधित केलं. यावेळी पंकजा मुंडे त्यांच्या कार्यकर्त्यांना म्हणाल्या, "खासदार व्हायला गेले आणि आमदार झाले, तुमचीच नजर लागली, असं वाटतंय. मी दिल्लीला गेल्यावर इथे लक्ष देणार नाही, असं सगळ्यांना वाटत होतं. त्यामुळेच असं झालं".असेही त्यांनी आपल्या भाषणात पुढे म्हटले. पंकजा मुंडे म्हणाल्या, "लोकसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी येथील अर्ध्याहून अधिक लोकांच्या मी पाया पडत होते. काय रे वेंकटेश...? काय दत्ताभाऊ...? खरं आहे की नाही? पाच-सहा हजार मतांनी झालेला पराभव हा पराभव नसतो. तुमचीच नजर लागली असं वाटतंय. मी दिल्लीला जाईन, दिल्लीला जाईन, असं सतत घोकत होते. ताई दिल्लीला गेल्यावर मग आम्ही काय करणार, त्या इथे लक्ष देणार नाहीत, असं सगळं यांचं चाललेलं. घ्या मग आता... आले मी परत तिथेच... खासदार करायला गेले आणि मी आमदार झाले".

## एकनाथ शिंदे यांचा उद्धव ठाकरेंवर निशाणा

# "आता खरे गद्दार कोण?"

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** २०१९ ची विधानसभा निवडणूक शिवसेना-भाजप एकत्रपणे लढली. मोदी-बाळासाहेबांचे फोटो लावून प्रचारही केला आणि मतदारांनी भरभरून मतेही दिली. मात्र, निकाल जाहीर झाल्यानंतर त्यांनी म्हटले की, आमच्यासाठी सर्व दरवाजे खुले आहेत. म्हणजे तुमचे ठरले होते. त्यानंतर महाविकास आघाडी स्थापन करून महाराष्ट्रातील जनतेच्या आणि भाजपच्या पाठीत खंजीर खुपसला. मग आता खरे गद्दार कोण, असा सवाल करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट



उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला.

राज्यात विधानसभा निवडणुकीचा प्रचाराची वेळ संपण्याआधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत विरोधकांनी केलेल्या आरोपांनाही प्रत्युत्तर दिले. तसेच, यावेळी त्यांनी धारावीतील जनतेला कोणाच्याही राजकारणाला बळी न पडण्याचे आवाहन केले. तसेच काँग्रेस आणि महाविकास आघाडीने केलेले आरोप म्हणजे बालिशपणा आहे, असे म्हणत त्यांनी महाविकास आघाडीच्या आरोपांचे खंडन केले. एकनाथ शिंदे म्हणाले, राहुल गांधी यांनी मुंबईत तिजोरी आणली होती. आम्हाला वाटले त्यांनी महाराष्ट्राला काहीतरी देण्यासाठी ही तिजोरी आणली आहे. पण त्यांनी त्यामधून अदानी यांचा फोटो काढला. महाराष्ट्र लुटण्यासाठी इथल्या तिजोऱ्या कमी पडल्या, तर यांनी आता दिल्लीवरून तिजोरी आणली आहे, असा टोलाही त्यांनी लगाविला.

तसेच आम्ही जमीन अदानी यांना दिलेली नाही. आम्ही जमीन डीआरपीला दिलेली आहे. त्यांच्याकडून २ लाख नागरिकांना तिथे घरे मिळणार आहेत. मविआचे सरकार असताना त्यांनी सांगितले की फक्त पत्र लोकांना द्या. आम्ही सांगितले, जेवढे लोकं असतील त्या सगळ्यांना द्या. ६० हजार लोकांना घरे देण्याचा निर्णय त्यांचा तर २ लाख लोकांना घरे देण्याचा आमचा निर्णय, असे म्हणत त्यांनी मविआवर निशाणा साधला.

# बारामतीचे नाव देशात करायचे आहे

## भावनिक न होता विकासाला मतदान करण्याचे दादांचे आवाहन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** आजपर्यंत विकासाच्या बाबतीत बारामतीचे नाव राज्यात अग्रक्रमाने घेतले जाते. तथापि, विकासाचा हा बारामती पॅटर्न आपल्याला देशात न्यायचा आहे. त्यासाठी तुम्ही सर्वाधिक मतांनी मला विजयी करा. जितक्या मताधिक्याने आपण निवडून येऊ, तितक्या प्रमाणात भरघोस निधी बारामतीच्या विकासासाठी मिळेल. भावनिक न होता, विकासाला बारामतीकरांनी मतदान करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केल. ते येथील सांगता सभेत बोलत होते.

बारामती





अजित पवार म्हणाले की, आजवर तालुक्यात खूप मोठ्या प्रमाणात विकासासाठी निधी आणला गेला. आता त्यापेक्षा जास्त निधी आपल्याला आणायचा आहे. विरोधक आपल्याविरोधात अपप्रचार करत आहेत. त्यांनी पातळी सोडली असली, तरी आपण संयमाने वागायचे आहे. बारामती टेक्स्टाईल पार्कमध्ये प्रतिभा पवार यांची कोणतीही अडवणूक झालेली नसताना, तसे भासवायचा त्यांनी प्रकार केला. भावनिक होत मते मागायचा प्रयत्न समोरच्या उमेदवारांकडून होत असला, तरी तुम्ही विकासावर ठाम रहा. लोकसभेला ठीक होते, आता नाही, असेही ते म्हणाले.

विरोधक तुमच्यावर दबाव आणायचा प्रयत्न करतील. मात्र, त्याला बळी पडू नका. तुम्ही संयम सोडू नका. तरीही तुमच्या बाबतीत काही प्रकार घडला, तर संबंधितांना आपण सोडणार नाही. त्यांना प्रसंगी तडीपार करू. बारामतीत गुंडगिरी चालू देणार नाही. तसे काही झाले तर माझ्याशी गाठ आहे, असा इशाराही दादांनी दिला. बारामतीमधील ज्या संस्था आहेत, तेथे विरोधक आपल्या माणसांच्या नेमणुका करवून घेत आहेत. तुम्ही त्याची काळजी करू नका. त्याकडे मी स्वतः लक्ष देणार आहे. तसेच पीडीसीसी बँकेत १ हजार जागांची भरती परिक्षा घेऊन होणार आहे, त्यात आपली मुले-मुली कशी उत्तीर्ण होतील, याकडे लक्ष द्या, असेही त्यांनी उपस्थितांना सांगितले. त्याचवेळी बारामतीच्या जिरायती भागाचा प्रश्न कायमस्वरुपी आपण सोडवू. निवडणुका झाल्या की संपूर्ण तालुका सुजलाम सुफलाम करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

### पार्थ पवार यांनी दुचाकीवर बसून ऐकली सभा..!

● अजित पवार यांच्या प्रचाराची सांगता सभा आज पार पडली. या सभेला बारामतीकरांनी मोठ्या संख्येने गर्दी करत अजितदादांवरील विश्वास व्यक्त केला. दरम्यान, युवा नेते पार्थ पवार यांनी चक्क कार्यकर्त्यांसोबत दुचाकीवर बसून अजितदादांचे भाषण ऐकले. कोणताही अविर्भाव न बाळगता पार्थ पवार यांनी दाखवलेला साधेपणा उपस्थितांना भावणारा ठरला. अजितदादांच्या मातोश्री आशाताई पवार यांची उपस्थिती ही बारामतीकरांसाठी विशेष महत्त्वाची ठरली. जय पवार यांच्या नेतृत्वात दुचाकी रॅली काढण्यात आली. माळेगावपासून सभास्थळापर्यंत दुचाकी रॅली काढण्यात आली. यामध्ये युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# आंबेगावच्या निवडणुकीत डिंभे धरणाचे पाणी

## दिलीप वळसे पाटील यांनी बोगद्याला केला कडाडून विरोध





आंबेगावचे लोकप्रतिनिधी दिलीप वळसे पाटील यांनी डिंभे धरणाच्या बोगद्याला कडाडून विरोध केला. मात्र, नगर जिल्ह्यातील कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार, खासदार निलेश लंके, घनश्याम शेलार यांच्या धरणाच्या बोगद्याविषयीच्या व्हिडिओ क्लिप प्रचंड व्हायरल झाल्या. डिंभे धरणाच्या पाण्याचा प्रश्न हा शेतकऱ्यांसह सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय असल्याने, आंबेगाव तालुक्यासह जुन्नर, खेड, शिरूर तालुक्यातील वातावरण अक्षरक्षः ढवळून निघाले.

**आंबेगाव :** आंबेगाव शिरूर विधानसभा मतदारसंघाची यंदाची निवडणूक डिंभे धरणाचे पाणी व बोगद्यावरच गाजली. सुरुवातीपासून आंबेगावचे लोकप्रतिनिधी दिलीप वळसे पाटील यांनी डिंभे धरणाच्या बोगद्याला कडाडून विरोध केला. मात्र, नगर जिल्ह्यातील कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार, खासदार निलेश लंके, घनश्याम शेलार यांच्या धरणाच्या बोगद्याविषयीच्या व्हिडिओ क्लिप प्रचंड व्हायरल झाल्या. डिंभे धरणाच्या पाण्याचा प्रश्न हा शेतकऱ्यांसह सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय असल्याने, आंबेगाव तालुक्यासह जुन्नर, खेड, शिरूर तालुक्यातील वातावरण अक्षरक्षः ढवळून निघाले आहे.



डिंभे धरणाच्या बोगद्याला विरोध करण्यासाठी आंबेगाव तालुक्याचे लोकप्रतिनिधी दिलीप वळसे पाटील यांनी शरद पवारांची साथ सोडली. भविष्यात डिंभे धरणाच्या पाण्याचा प्रश्न उभा राहणार आहे, हे वळसे पाटलांकडून फार पूर्वीपासूनच ऐकायला मिळत होते. परंतू ते कोणीही फारशा गांभीर्याने घेतले नाही. विधानसभा निवडणुक जाहीर होईपर्यंत त्यावर कोणी चर्चाही केली नाही. मात्र, वळसे पाटील यांनी सुरुवातीपासूनच डिंभे धरणाच्या प्रस्तावित बोगद्याला आपला विरोध आहे, हे जाहीर करून निवडणुकीचा अर्ज भरला. पहिल्या सभेपासून त्यांनी डिंभे धरणाच्या बोगद्याला विरोधच केला. विरोधी उमेदवार देवदत्त निकम यांनी मात्र बोगद्याविषयी आपली भूमिका स्पष्ट केली नाही. त्यांच्याकडे फक्त शरद पवारांची वळसे पाटलांनी साथ का सोडली? एवढाच मुद्दा प्रचारसभांमध्ये सातत्याने दिसला.

आंबेगाव

निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असताना, आमदार रोहित पवार, खासदार निलेश लंके, घनश्याम शेलार, उद्धव ठाकरे यांनी डिंभे माणिकडोह बोगद्यावरुन सकारात्मक वक्तव्ये केल्याचे व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाले. या सर्व नेत्यांचा डिंभे माणिकडोह बोगद्याला पाठींबा असल्याचे जाहीर झाले. एकट्या दिलीप वळसे पाटलां विरुद्ध हे सर्व लोकप्रतिनिधी एकत्र आले आणि तेथेच वातावरण फिरले. दिलीप वळसे पाटलांना अप्रत्यक्षरीत्या मतदारसंघात पोषक वातावरण निर्माण झाले.

डिंभे धरण हे कुकडी प्रकल्पातील मोठे धरण असून, त्याची साडेतेरा टीएमसी पाणी साठवण क्षमता आहे. त्या धरणासाठी अनेक आदिवासी गावे स्थलांतरित झाली. मात्र, अद्यापही आदिवासी भागातील काही भाग पाण्यापासून वंचितच आहेत. तसेच लोणी धामणीचा परिसर, सातगाव पठार भागातील कलमोडी प्रकल्प व आंबेगाव तालुक्याला नव्याने जोडलेली शिरूर तालुक्यातील १२ गावेही पाण्यापासून वंचितच आहेत. या गावांचा पाणी प्रश्न पुढील पाच वर्षात आपण सोडवणार असल्याचे वळसे पाटील यांनी जाहीर केले आहे. डिंभे धरणाच्या तळाशी बोगदा केला, तर ते तीन महिन्यातच रिकामे होऊन पुन्हा दुष्काळी स्थिती निर्माण होणार आहे. हीच बाब गंभीर असल्याने, येथील जनमत वळसे पाटील यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिलेले दिसून येत आहे.

### डिंभे धरणाच्या बोगद्यावर शरद पवारांचे मौन

● जेष्ठ नेते शरद पवार हे मंचर येथील प्रचारसभेत डिंभे धरणाच्या बोगद्यावर काही तरी बोलतील, या अपेक्षेने मोठी गर्दी झाली होती. मात्र, शरद पवारांनी या बोगद्यावर 'ब्र' शब्द देखील काढला नाही. यावरून बोगद्याला शरद पवारांचा पाठिंबाच आहे, असा संदेश तालुक्यात गेला. आपल्या नातवाच्या बालहट्टापायी शरद पवारांनी बोगद्यावर बोलणे टाळले, अशी देखील चर्चा ऐकायला मिळाली.

### मांजराचे दात पिलाला लागत नाहीत

● आंबेगाव शिरूर विधानसभा मतदारसंघात होत असलेल्या निवडणुकीत गेले सात वेळा लोकप्रतिनिधित्व करत असलेले दिलीप वळसे पाटील या निवडणूकीत प्रथमच शरद पवारांची साथ सोडून निवडणूक लढवत आहेत. त्यांनी डिंभे धरणाच्या पाण्याच्या प्रश्नावरून शरद पवारांची साथ सोडली. शरद पवारांनी या मतदारसंघातील मंचरमध्ये सभा घेऊन दिलीप वळसे पाटलांना पराभूत करा, पाडा असे ते म्हणाले. ती देखिल चर्चा झाली. परंतू मांजराचे दात पिलाला लागत नाही, अशाही चर्चेला मतदारसंघात उधाण आले.

### आमदार दिलीप मोहिते पाटील यांचे स्पष्टीकरण

# भामा आसखेडचे पाणी वाटप झाले तेव्हा मी आमदार नव्हतो

**चाकण :** भामा आसखेड धरणाचे पाणी वाटप ज्यावेळी झाले त्यावेळी मी आमदार नव्हतो. भामा आसखेड धरणाचे पाणी वाटप सन २०१४-१९ या कालावधीत धरणाचे १०० टक्के पाणी वाटप करण्यात आले आहे. मी तालुक्यातील धरणे विकून टाकली नाहीत. भामा आसखेड धरणाचे भूमिपूजन शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले होते. त्या वेळेला नारायण पवार आमदार होते. मी माझ्या स्वतःच्या कार घेऊन त्या कार्यक्रमाला उपस्थित होतो, असे स्पष्टीकरण आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी केले. खेड आळंदी विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार दिलीप मोहिते पाटील यांच्या शिरोली येथे गाव भेट दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

खेड



मोहिते पाटील म्हणाले की, राज्य सरकारने मुलींना मोफत शिक्षण ही योजना सुरू केली आहे. महिलांसाठी लाडकी बहीण योजना सुरू केली. शेतकऱ्यांचे वीज बील माफ केले. सर्व जाती धर्मसाठी महामंडळे काढली आहेत. उमेदवारी अर्ज भरण्याच्या माघारीपर्यंत विरोधकांचा उमेदवार ठरला नव्हता. अतूल देशमुख यांनी तयारी केली होती. त्यांच्यात एकमत नव्हते. सात जण इच्छुक होते. त्यातील एकाला तिकीट मिळाले. सहा जण नाराज आहेत. तालुक्यात आज पर्यंत १५ आमदार झालेत पण मंत्रीपदाची संधी मिळाली नाही. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी मंत्रीपदाची संधी देण्याचे जाहिर केले आहे. राज्यात महायुतीचे सरकार येणार असून, मंत्री झाल्यावर तालुक्यातील प्रश्न सुटतील. तालुक्यात इंजिनिअरिंग कॉलेज नाही. ते आम्ही सुरू करणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टेपाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष कैलास सांडभोर, कृष्णा खोरे महामंडळाचे संचालक राम गावडे, गणेश सांडभोर, आरपीआयचे अध्यक्ष दिलीप नाईनवरे, शांताराम चव्हाण, नवनाथ होले, वैशाली जाधव, विशाल पोतले, सुनिल देवकर, सरपंच मुदिता देखणे, शिवाजी डावरे, दत्ता मांडेकर, संजय सावंत, चंद्रकांत सावंत, संजय देखणे, संतोष खरपासे, रविंद्र सावंत, जगन सावंत, हरेश देखणे, नारायण शिंदे, उज्वला शिंदे, हिरा वाळुंज, चैताली सावंत, दुर्गा लोखंडे, शुभांगी सावंत, जया दसगुडे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आंबेडकरी चळवळीला प्रस्थापित राजकारणात प्रतिष्ठा कधी ?

रत्नाकर मखरे यांच्या पश्चात अँड राहुल मखरे हे रत्नाकर मखरे यांच्या विचारांचे वारसदार म्हणून बहुजन चळवळ राज्यात सक्रिय पणाने चालवित आहेत मात्र असे असताना अँड .राहुल मखरे यांनी बामसेफ सारख्या केडरबेस असणाऱ्या राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील सामाजिक संघटने मध्ये अनेक वर्षे काम केलेले आहे. शरदचंद्र पवार यांच्या हस्ते मखरे यांचा राष्ट्रवादीतील पक्षप्रवेश पुणे येथे घेण्यात आला. अँड.मखरे यांना राष्ट्रवादी काँग्रेसने राज्य सचिव पदाची जबाबदारी दिली. परंतु राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकास्तरावरील पदाधिकाऱ्यांनी पक्षीय कार्यपध्दती मुळे अँड .राहुल मखरे यांना स्टेजवर न बोलविणे,भाषण करण्यास संधी न देणे , चुकून भाषण करण्याची संधी दिलीच तर एक दोन मिनिटांचा वेळ देणे , राजकीय प्रक्रियेत व प्रचार यंत्रणेत महत्त्व न देणे, समावून न घेणे , इंदापूर येथे मार्केट यार्ड मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यक्रम असताना अँड मखरे हे खाली लोकांमध्ये बसले होते परंतु दस्तुरखुद्द शरदचंद्र पवार यांनी मखरे यांना बोलावून स्टेजवर घेतले होते.



राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार पक्ष,रिपाई, शिवसेना शिंदे गट,भाजप अशी महायुती आहे महायुतीचे उमेदवार दत्ता मामा भरणे यांचे बरोबर रिपाइंचे नेते, कार्यकर्ते काम करीत आहेत. तसेच शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नुकतेच पक्षप्रवेश केलेले वंचित आघाडीचे हनुमंत कांबळे , रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष संदीपान कडवळे, बहुजन रयत परिषदेचे कार्यकर्ते काम करीत आहेत,अपक्ष परिवर्तन आघाडीत रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा अध्यक्ष विक्रम शेलार , जोगेंद्र कवाडे यांच्या रिपाई पक्षाचे सोनवणे तसेच मातंग समाजातील समाज संघटनेचे पदाधिकारी काम करीत आहेत.यांनी समाजहित डोळ्या समोर ठेवून राजकीय सामाजिक प्रश्नांची उकल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक झाले आहे

**समाजाच्या दबाव गटाची गरज**

आंबेडकरी जनतेचा पाठिंबा मिळवणे म्हणजे स्वतःच्या पक्षावर पुरोगामित्वाचा शिक्का मोर्तब करणे आणि सोशल इंजिनिअरिंगचा प्रयोग करणे सर्वच मोठ्या पक्षांना गरजेचे वाटत असल्याने कोणत्या ना कोणत्या आंबेडकरी गटतटांशी युती करण्याचा त्यांचा प्रयत्न सातत्याने चालू असतो परंतु नेतृत्वाची हेळसांड, दुय्यम दर्जाची वागणूक मिळत असेल तर नेतृत्वाने देखील आपल्या स्वतःच्या उपद्रव क्षमता तपासून रिपब्लिकन जनतेच्या पक्षात पुन्हा माघारी फिरावे व फुले शाहू आंबेडकर विचारधारेचा विचार जिवंत ठेवावा,आंबेडकरी चळवळ , पक्ष स्वाभिमानाने चालवून राजकारणात दबाव गट निर्माण केला पाहिजे त्या दबाव गटात ,मातंग , चर्मकार,नौबौध्द व फुले शाहू आंबेडकर विचारधारा मानणा-या अल्पसंख्याक , ओबीसी समाज असला पाहिजे .समाज ऐक्य घडवून राजकारणात सक्रिय होणे काळाची गरज आहे. जो पक्ष फुले शाहू आंबेडकर विचारधाराची जोपासना करील त्याचा पक्षाला समर्थन द्यावे अशी भावना समाज बांधवांनी व्यक्त केल्या आहेत. **समाप्त**


मीरा ह्युंदाई तर्फे सनसिटी सिंहगड रोड येथे



'ह्युंदाई ऑलवेज अराउंड कॅम्प' यशस्वीरित्या संपन्न

पुणे: ह्युंदाई मोटर्स इंडियाच्या वतीने मीरा ह्युंदाईने रविवार, १७ नोव्हेंबर २०२४ रोजी सनसिटी सिंहगड रोड येथे 'ह्युंदाई ऑलवेज अराउंड कॅम्प' यशस्वीरित्या आयोजित केला. या कॅम्पचे उद्घाटन मोबिसचे रिजनल पार्टस मॅनेजर श्री. आनंद चांबरे आणि टीपीएसएम श्री. श्रीकर मांडवा यांच्या हस्ते करण्यात आले.

या कॅम्पमध्ये ग्राहकांसाठी सेल, सर्विस आणि एक्सचेंज डिपार्टमेंटद्वारे विशेष सेवा उपलब्ध होत्या. अनेक ग्राहकांनी त्यांच्या ह्युंदाई वाहनांचे १८ पॉईंट्स चेकअप करून घेतले आणि स्पिन अँड विन ऑफरचा लाभ घेत आकर्षक सवलती मिळवल्या.

लहान मुलांसाठी आयोजित ड्रॉइंग स्पर्धेला विशेष प्रतिसाद मिळाला. चिमुकल्यांनी उत्साहाने सहभाग घेत विविध सुंदर चित्रे काढून बक्षिसे मिळवली.

मीरा ह्युंदाईने ग्राहकांचे समाधान हेच प्राधान्य मानून यापुढेही अशा उपक्रमांद्वारे सेवांचे वचन दिले आहे.

– मीरा ह्युंदाई, वारजे, पुणे.

### पन्नास तुकड्या पाठवण्याचा केंद्राचा आदेश

# मणिपूरमध्ये जाळपोळ सुरूच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**इंफाळ/नवी दिल्ली :** मणिपूरच्या खोऱ्यात हिंसाचार आणि निदर्शने सातत्याने वाढत आहेत. जिरीबाम जिल्ह्यात रविवारी झालेल्या गोळीबारात एका २० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला, तर दुसरा जखमी झाला. जमावाने भाजप-काँग्रेसच्या कार्यालयांची तोडफोड सुरू केली. बाबुपारा भागात रात्री ११ वाजण्याच्या सुमारास सुरक्षा दलांनी जमावाला नियंत्रित करण्यासाठी गोळीबार केल्याची घटना घडली. अथौबा असे मृताचे नाव आहे. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी परिस्थितीचा आढावा घेऊन मणिपूरमध्ये आणखी पन्नास तुकड्या पाठवण्याचा निर्णय घेतला.



हिंसाचारादरम्यान, जमावाने भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेसच्या स्थानिक कार्यालयांची तोडफोड केली आणि फर्निचर आणि इतर वस्तूंना आग लावली. जिरीबाम पोलीस ठाण्यापासून अवघ्या ५०० मीटर अंतरावर या घटना घडल्या. जखमी व्यक्तीला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे; मात्र त्याच्या प्रकृतीबाबत अद्याप कोणतीही माहिती उपलब्ध नाही. दरम्यान, मणिपूरमधील वाढत्या हिंसाचाराबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज अधिकाऱ्यांची बैठक घेतली. मणिपूरमधील काही आमदार आणि मंत्रीही दिल्लीत बैठकीला आले होते. त्यानंतर केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाच्या आणखी पन्नास तुकड्या मणिपूरमध्ये पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. जमावाने तोडफोड आणि जाळपोळ केल्याच्या घटनांमध्ये मणिपूर पोलिसांनी २३ जणांना अटक केली आहे. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून एक पिस्तूल, सात गोळ्या आणि आठ मोबाईल फोन जप्त केले आहेत.

मणिपूरमध्ये वाढत्या हिंसाचारामुळे इंफाळ पश्चिम आणि इम्फाळ पूर्व जिल्ह्यात संचारबंदी लागू करण्यात आली आहे. तसेच परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन खोऱ्यातील सात जिल्ह्यांतील इंटरनेट सेवाही बंद करण्यात आली आहे. यापूर्वी मणिपूरमध्ये सहा जणांच्या हत्येनंतर परिस्थिती चिघळली होती आणि हिंसाचार पसरू लागला होता. मणिपूरमधील वाढत्या संकटाच्या पार्श्वभूमीवर 'नॅशनल पीपल्स पार्टी'ने (एनपीपी) भाजपच्या नेतृत्वाखालील मणिपूर सरकारला दिलेला पाठिंबा काढून घेतला आहे. 'एनपीपी'चे राष्ट्रीय अध्यक्ष आणि मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड संगमा यांनी भाजपचे प्रमुख जे. पी. नड्डा यांना पत्र लिहून राज्यातील ढासळत्या कायदा आणि सुव्यवस्थेबद्दल चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी पत्रात लिहिले आहे, की मणिपूरमध्ये सुरू असलेल्या संकटाचे निराकरण करण्यात राज्य सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने ६० जागांच्या विधानसभेत ३२ जागा जिंकल्या होत्या; परंतु 'एनपीपी'ने पाठिंबा काढून घेतल्याने भाजपचा आकडा आता ३२ वर आला आहे. या घडामोडींमुळे विधानसभेत भाजपची स्थिती कमकुवत होताना दिसत आहे.

यापूर्वी कुकी पीपल्स पार्टीने (केपीए) जातीय हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील 'एनडीए' सरकारचा पाठिंबा काढून घेतला होता. भाजपच्या ३७ आमदारांतही सिंह यांना बदलण्याची मागणी वीसहून अधिक आमदारांनी केली आहे. त्यामुळे सरकार अडचणीत आले आहे.


#### दीड वर्षांपासून हिंसाचार

● मणिपूर गेल्या एक वर्षाहून अधिक काळ वांशिक संघर्षाशी झुंजत आहे. मणिपूरमधील बहुसंख्य मैतेई समुदायाला अनुसूचित जमातीचा दर्जा देण्याच्या मागणीच्या निषेधार्थ मणिपूरच्या डोंगराळ जिल्ह्यांमध्ये आदिवासी एकता मोर्चा काढण्यात आल्यानंतर गेल्या वर्षी तीन मे रोजी जातीय हिंसाचार झाला. राज्यात सुरू असलेल्या हिंसाचारात कुकी आणि मेतेई समुदायातील २२० हून अधिक लोक आणि सुरक्षा कर्मचारी मारले गेले आहेत. हजारो लोक बेघर झाले आहेत.

## हिज्बुल्लाचा माध्यम प्रमुख हवाई हल्ल्यात ठार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बेरूत :** इस्रायलकडून हिजबुल्लावर सातत्याने हल्ले होत आहेत. दररोज इस्रायली सैन्य हिजबुल्लाची मोठी हानी करत आहे. आता लेबनॉनची राजधानी बेरूतमध्ये इस्रायली हल्ल्यात हिजबुल्लाचा माध्यम विभाग प्रमुख मोहम्मद अफिफ मारला गेला.



टाईम्स ऑफ इस्रायलच्या वृत्तानुसार, हिजबुल्लाने मोहम्मद अफिफच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. मध्य बेरूतमधील सीरियन बाथ पार्टीच्या मुख्यालयावर आयडीएफच्या हल्ल्यात अफिफ मारला गेला. इस्रायलने अद्याप हिजबुल्लाच्या प्रवक्त्याच्या हत्येला दुजोरा दिलेला नाही.

अल जझीराच्या वृत्तानुसार, अफिफने हिजबुल्लाहसाठी अनेक पत्रकार परिषदा घेतल्या आहेत, ज्यामध्ये इस्रायली बॉम्बहल्ल्याची माहिती देण्यात आली होती. अफिफने सशस्त्र गटाचे उच्च माध्यम संबंध अधिकारी म्हणून पदभार स्वीकारण्यापूर्वी अनेक वर्षे हिजबुल्लाहच्या अल-मनार टेलिव्हिजन स्टेशनचे व्यवस्थापन केले.

## बांगलादेशाच्या परराष्ट्र धोरणात मोठा बदल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**ढाका :** बांगलादेशातील सत्ताबदलानंतर देशाच्या व्यापार धोरणात आणि परराष्ट्र धोरणातही बदल होताना दिसत आहेत. कराचीहून एक मालवाहू जहाज चट्टोग्रामला पोहोचले आहे. अनेक वर्षानंतर पाकिस्तान आणि बांगला देशात व्यापार-उदीम सुरू होत आहे. त्यातून भारताला शह देण्याचा प्रयत्न आहे.



शेख हसीना सत्तेतून बाहेर पडल्यानंतर बांगला देशच्या परराष्ट्र आणि व्यापार धोरणात मोठे बदल होतील, असे मानले जात होते. दोन्ही देशांमधील ऐतिहासिकदृष्ट्या तणावपूर्ण संबंधांमध्ये बदल म्हणून याकडे पाहिले जाऊ शकते, असा दावाही पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी केला आहे. आतापर्यंत दोन्ही देशांच्या संबंधांमध्ये १९७१ च्या युद्धाची छाया महत्त्वाची भूमिका बजावत होती. १९७१ च्या नऊ महिन्यांच्या मुक्ती संग्रामात पाकिस्तानी लष्कराने बांगला देशातील जनतेवर अगणित अत्याचार केले. सुमारे ३० लाख लोक मारले गेले. हजारो लोकांवर अत्याचार झाले. महिलांवर बलात्कार झाले आणि लाखो लोक घर सोडून पळून गेले. या जुन्या आठवणी आजपर्यंत दोन्ही देशांच्या संबंधांवर प्रभाव टाकत होत्या. या अत्याचारांबद्दल पाकिस्तानकडून कधीही खेद किंवा माफी मागितली गेली नाही. उलट १९७१ च्या बांगला देश घटनेसाठी पाकिस्तानने नेहमीच भारताला जबाबदार धरले.

पाकिस्तानचा आरोप आहे, की बांगला देशात कोणतेही अत्याचार झाले नाहीत; पण हे सर्व भारताने प्रायोजित केले होते. त्याचा उद्देश पाकिस्तानचे जनक मोहम्मद अली जिना यांचा प्रकल्प अयशस्वी करणे हा होता. पाकिस्तानी लष्कर आपल्या देशातील जनतेमध्ये भारताला आपला शत्रू बनवून देशाच्या राजकारणात स्वत:साठी महत्त्वाचे स्थान मिळवते.

#### भारताबरोबरचे शत्रुत्व वाढणार

● बांगला देशाच्या राजधानीत भारतविरोधी विचार असलेल्या लोकांचा वाढता प्रभाव पाहून आगामी काळात बांगला देशचे भारताविषयीचे शत्रुत्व आणखी वाढेल आणि त्याचवेळी पाकिस्तानसोबतचे संबंध आणखी सुधारतील, असा अंदाज आहे.

## » Selected

### रघुविंदर शोकीन मंत्री होणार

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाचा राजीनामा दिलेल्या कैलाश



गेहलोत यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांनी 'आप'च्या प्राथमिक सदस्यत्वाचा आणि मंत्रिपदाचा राजीनामा दिला. दरम्यान, 'आप' नेते रघुविंदर शोकीन हे दिल्लीतील मंत्रिमंडळात नवे मंत्री होणार आहेत. शोकीन हे नांगलोई जाटचे आमदार आहेत. ते कैलाश गेहलोत यांची जागी घेतील, असे 'आप'कडून सांगण्यात आले आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांच्या नेतृत्त्वाखालील मंत्रिमंडळात फेरबदल केला जात आहे.

### रॅगिंगमुळे गुजरातमध्ये विद्यार्थ्याचा मृत्यू

**अहमदाबाद :** कॉलेजमध्ये वरिष्ठ विद्यार्थ्यांकडून कनिष्ठ विद्यार्थ्यांवर होणाऱ्या रॅगिंगच्या घटना म्हणजे निव्वळ विकृती असून, यावर केंद्र, राज्य सरकारसह सर्वोच्च न्यायालयाने वारंवार गंभीर चिंता व्यक्त केली आहे. असे असताना रॅगिंगमुळे आणखी एक बळी गेल्याचा प्रकार गुजरातमधील धारपूर मेडिकल कॉलेजमध्ये घडला आहे. येथे 'एमबीबीएस'च्या प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याचा रॅगिंगवेळी तासन्तास उभे राहण्यास भाग पाडल्याने मृत्यू झाला आहे. याप्रकरणी मेडिकल कॉलेजच्या १५ वरिष्ठ विद्यार्थ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिल मेथनिया या विद्यार्थ्याने गुजरातच्या धारपूर मेडिकल कॉलेजमधील प्रथम वर्षाला प्रवेश घेतला होता. वरिष्ठ विद्यार्थ्यांनी रविवारी रात्री रॅगिंगचा भाग म्हणून त्याला सलग उभे राहण्यास सांगितले. तो सलग तीन तास तो उभा राहिला. अखेर अनिल जागीच कोसळला. त्याला तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

### जमिनीच्या वादातून तरुणाची जाळून हत्या

**आझमगड :** काल रात्री आझमगडमधील सरायमीर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील परहा मौ रांगडीह गावात जमिनीच्या वादातून शेजाऱ्यांनी एका तरुणावर पेट्रोल टाकून त्याला पेटवून दिले. या घटनेत तरुण गंभीर भाजला. त्याला उपचारासाठी विभागीय जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेनंतर गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, घटनास्थळी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. उपचार सुरू असताना त्याचे निधन झाले.

## बलवंतसिंगच्या याचिकेवर दोन आठवड्यात निर्णय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंजाबचे माजी मुख्यमंत्री बेअंत सिंग यांचा मारेकरी बलवंतसिंग राजोआना याच्या दयेच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतींच्या सचिवांना दया याचिका विचारार्थ राष्ट्रपतींसमोर सादर करण्याचे निर्देश दिले. बलवंत सिंग यांच्या दयेच्या याचिकेवर दोन आठवड्यात विचार करावा, असेही न्यायालयाने राष्ट्रपतींना सांगितले आहे.



याप्रकरणी पुढील सुनावणी ५ डिसेंबरला होणार आहे. न्यायमूर्ती भूषण गवई, पी. के. मिश्रा आणि केव्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठाने राष्ट्रपतींना दोन आठवड्यांत या याचिकेवर विचार करण्याची विनंती केली. खंडपीठाने सांगितले, की आज या प्रकरणाचा विशेष उल्लेख असूनही भारत सरकारच्या वतीने कोणीही हजर झाले नाही. या प्रकरणासाठीच खंडपीठ जमले. खंडपीठाने सांगितले, की या प्रकरणाची सुनावणी आधीच्या तारखेला स्थगित करण्यात आली होती. जेणेकरून दयेच्या अर्जावर निर्णय केव्हा येईल याविषयी केंद्र सरकार राष्ट्रपती कार्यालयाकडून सूचना घेऊ शकेल.

याचिकाकर्त्याला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. आम्ही सचिवांना ते भारताच्या राष्ट्रपतींसमोर ठेवण्याचे निर्देश देतो आणि आजपासून दोन आठवड्यांच्या आत त्यावर विचार करण्याची विनंती करतो, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. २५ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने बलवंत सिंग राजोआना याच्या याचिकेवर केंद्र, पंजाब सरकार आणि केंद्रशासित प्रदेश चंदीगडच्या प्रशासनाकडून उत्तर मागितले होते. गेल्या वर्षी ३ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने बलवंतसिंग राजोआना याची फाशीची शिक्षा कमी करण्यास नकार दिला होता आणि सक्षम अधिकारी त्याच्या दयेच्या याचिकेवर विचार करू शकतात असे म्हटले होते.

राजोआना याने म्हटले आहे, की त्याच्या वतीने मार्च २०१२ मध्ये 'शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समिती'ने (एसजीपीसी) संविधानाच्या कलम ७२ अंतर्गत दयेचा अर्ज दाखल केला होता. ३१ ऑगस्ट १९९५ रोजी माजी मुख्यमंत्री बेअंत सिंग यांची चंदीगडमधील सचिवालयाबाहेर हत्या करण्यात आली.

### मराठी भाषिकांकडून परदेशात कृतज्ञता

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**अबुजा :** केंद्र सरकारने काही दिवसांपूर्वीच मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. नायजेरियातील मराठी भाषिकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन कृतज्ञता व्यक्त केली.

## इराणच्या सर्वोच्च नेतेपदी मुजतबा खोमेनी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**तेहरात :** इराणचे सर्वोच्च नेते आयातुल्लाह अली खोमेनी यांनी आपला दुसऱ्या क्रमांकाचा मुलगा मुजतबा खोमेनी यास आपला उत्तराधिकारी म्हणून नियुक्त केले आहे. पण, याबाबतची अधिकृत माहिती समोर आली नाही. ८५ वर्षीय खोमेनी आजारी आहेत. अशातच त्यांनी आपल्या मृत्यूच्यापूर्वी शांततामय मार्गाने आपले अधिकार आपल्या मुलाकडे सोपविले सांगण्यात येत आहे.



इराणच्या संसदेने २६ सप्टेंबर रोजी आपल्या नवीन सर्वोच्च नेत्याची निवड केली होती. स्वतः खोमेनी यांनी संसदेच्या ६० सदस्यांना बोलावून गुप्तपणे आपला उत्तराधिकारी निवडण्याचा निर्णय घेतला होता आणि त्याला सर्वांनी मान्यता दिली होती. मुजतबा यांना सर्वोच्च नेतेपदी निवडण्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून तयारी सुरू होती. त्यामुळे इराण सरकारने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांमध्ये मुजतबा यांचा वाटा मोठा होता. यापूर्वी मुजतबा यांनी इराणचे कोणतेही महत्त्वाचे पद भूषविलेले नाही, हे विशेष! मुस्तफा हा खोमेनी यांचा मोठा मुलगा आहे. त्याला त्यांनी आपला उत्तराधिकारी का बनविले नाही हे मात्र समोर आलेले नाही.

मुजतबा हे एक रहस्यमय व्यक्ती आहेत. ते खूपच कमी बाहेर दिसतात आणि ते कधीच आपल्या वडिलांप्रमाणे सार्वजनिकरीत्या भाषण देत नाहीत, तरीही त्यांचा देशात दबदबा आहे. इराणची गुप्तचर यंत्रणा आणि सरकारी यंत्रणेत मुजतबा यांचे जवळचे लोक कार्यरत आहेत.

## माजी मंत्री सुमेश शौकीन यांचा 'आप'मध्ये प्रवेश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभेच्या निवडणुका पुढील वर्षी असून त्याआधी पक्ष बदलाचे राजकारण सुरू झाले आहे. काँग्रेसचे माजी आमदार सुमेश शौकीन यांनी आम आदमी पक्षात प्रवेश केला आहे. अरविंद केजरीवाल यांनीच त्यांना आपचे सदस्यत्व दिले.



आम आदमी पक्षात प्रवेश करताना सुमेश शौकीन म्हणाले,"अरविंद केजरीवाल यांच्या पक्षाने ग्रामीण भागासाठी खूप काम केले आहे, ग्रामीण भागाला मुख्य प्रवाहाशी जोडण्याचे काम केले आहे. हे सर्व पाहून त्यांनी आम आदमी पार्टीत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. त्याचबरोबर सुमेश शौकीन यांनी शीला दीक्षित यांच्या १५ वर्षांच्या कार्यकाळाचाही उल्लेख केला. ते म्हणाले की, दिल्लीत शेती होते हे शीला दीक्षित यांनाही माहीत नव्हते.

## कर्नाटकात आमदाराच्या घोडेबाजाराचा आरोप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बेंगळुरू :** कर्नाटकात पुन्हा एकदा आमदारांच्या घोडेबाजाराचा मुद्दा उपस्थित झाला आहे. या वेळी हा आरोप कर्नाटक सरकारचे गृहमंत्री आणि काँग्रेस नेते जी. परमेश्वरा यांनी केला आहे.

ते म्हणाले, "भाजप अजूनही आमदारांना विकत घेण्याचा प्रयत्न करत आहे. आमदारांना पन्नास-पन्नास कोटी रुपये देऊन खरेदी करण्यात येत आहे. तसा प्रयत्न सुरू आहे. त्यांना वेगवेगळी आमिषे दाखवली जात आहेत. योग्य कागदपत्रे मिळाल्यास आम्ही या प्रकरणाची चौकशी करू. पुरावे सापडले, तर कारवाई करू. भाजप 'ऑपरेशन लोटस'साठी ओळखला जात आहे."



मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनीही आमदारांच्या घोडे-व्यापारबाबत टीका केली होती. सिद्धरामय्या यांनी दावा केला, की भाजपने त्यांचे सरकार पाडण्यासाठी ५० आमदार विकत घेण्याचा कट रचला होता. आमदारांना प्रत्येकी ५० कोटी रुपयांची ऑफर देण्यात आली होती. यावर भाजपने पलटवार करत काँग्रेस नेत्याला आपले दावे सिद्ध करण्याचे आव्हान दिले आहे; मात्र सिद्धरामय्या आपल्या दाव्यावर ठाम राहिले. ते म्हणाले होते, "मी तेच बोललो जे त्यांनी आधी केले होते. मी म्हणालो, की त्यांनी ५० कोटी रुपयांची ऑफर देऊन सरकार अस्थिर करण्याचा प्रयत्न केला, त्यात त्यांना यश आले नाही."

म्हैसूरमधील एका कार्यक्रमादरम्यान सिद्धरामय्या म्हणाले होते, की सिद्धरामय्या सरकार पाडण्यासाठी भाजपने ५० आमदारांना ५० कोटी रुपयांची ऑफर दिली. त्याच्याकडे एवढे पैसे कुठून आले? माजी मुख्यमंत्री बीएस येदियुरप्पा, बसवराज बोम्मई, विरोधी पक्षनेते आर अशोक, भाजप प्रदेशाध्यक्ष बीवाय विजयेंद्र यांनी पैसे छापले का? हे सर्व लाचेचे पैसे होते. असे ते म्हणाले.

### सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये शाब्दिक युद्ध

# हिमाचल प्रदेशात राजकीय अस्थिरता

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिमला :** हिमाचलमधील मुख्य संसदीय सचिवांबाबत (सीपीएस) उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर राज्यात राजकीय पेच वाढला आहे. या मुद्द्यावरून सध्या सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये शाब्दिक युद्ध सुरू आहे. भाजप आणि काँग्रेस एकमेकांना शह देण्यासाठी डावपेच आखत आहेत. सहा सीपीएस व्यतिरिक्त कॅबिनेट दर्जा मिळालेल्या तीन आमदारांच्या सदस्यत्वावरही भाजप प्रश्न उपस्थित करत आहे.

काँग्रेसच्या नजरा भाजपच्या त्या नऊ आमदारांवर खिळल्या आहेत, ज्यांचे प्रकरण विधानसभा अध्यक्षांकडे प्रलंबित आहे. काँग्रेसच्या नऊ आमदारांचे सदस्यत्व रद्द करण्यासाठी भाजप राज्यपालांकडे जाण्याच्या तयारीत आहे, तर काँग्रेसही भाजपच्या नऊ आमदारांवर डोळा ठेवून आहे. भाजपच्या नऊ आमदारांच्या सदस्यत्वाची चर्चाही जोर धरू लागली आहे. विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सभागृहात गोंधळ घातल्याचा आरोप भाजपच्या आमदारांवर आहे. यावेळी त्यांनी विधानसभा अध्यक्षांच्या खुर्चीजवळ जाऊन कागदपत्रे फाडल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

तक्रारीनंतर विधानसभा अध्यक्षांनी त्यांना नोटीस बजावून कारवाई सुरू केली. यावर विधानसभा अध्यक्षांचा निर्णय येत्या काळात येऊ शकतो. यावर अध्यक्षांनी निर्णय घेतल्यास भाजप अडचणीत येऊ शकतो. या आमदारांमध्ये उनामधून सतपाल सत्ती, नाचनमधून विनोद कुमार, चुराहून हंसराज, बंजारमधून सुरेंद्र शौरी, सुल्हमधून विपिन परमार, बिलासपूरमधून त्रिलोक जामवाल, बाल्हमधून इंदर सिंग गांधी, अनीमधून लोकेंद्र कुमार आणि कारसोगमधून दीपराज यांचा समावेश आहे. विधानसभा अध्यक्ष कुलदीप सिंह पठानिया यांनी त्यांना नोटीस दिली आहे. त्यांची उत्तरेही आली आहेत.

> 'अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान सभागृहात भाजप आमदारांचे वर्तन आणि कागदपत्रे फाडल्याच्या तक्रारी काँग्रेस आमदारांनी विधानसभा अध्यक्षांकडे केल्या आहेत. यावर अंतिम निर्णय विधानसभा अध्यक्ष घेतील. ही बाब विधानसभा अध्यक्षांच्या अखत्यारीत येते. भाजप आमदारांची वागणूक चुकीची होती, त्यामुळे काँग्रेसला तक्रार करावी लागली.
>
> **-नरेश चौहान,** मुख्यमंत्र्यांचे प्रमुख माध्यम सल्लागार



अश्विन व माझ्यामधील झुंजी रंगल्या आहेत, पण ही मालिका पाच वेस्ट इंडीज्चा बडाकेबाज सामन्यांची आहे. एखाद्या डावात वरचढ झाल्यानंतरही समाधानी राहून चालणार नाही. कारण, १० डाव असणार आहेत. पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत प्रत्येकाचा कस लागतो. — स्टीव्हन स्मिथ

'मी आपल्या संघाला शुभेच्छा देतो. बाकी कोणाचं फार ऐकू नका, मैदानात जाऊन तुमचा खेळ खेळा. जो संघ चांगला खेळेल, तो जिंकेल. खूप दबाव घेण्याची गरज नाही.' — कपिल देव



## पुरुष आयटीएफ टेनिस स्पर्धेत भारताचा

# करण सिंग उपांत्य फेरीत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क






**पुणे :** महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना(एमएसएलटीए) यांच्या वतीने 25हजार डॉलर पुरुष आयटीएफ टेनिस स्पर्धेत एकेरीत मुख्य ड्रॉच्या करण सिंग या भारताच्या खेळाडूने उपांत्य फेरीत प्रवेश केला.

एमएसएलटीए टेनिस कोर्ट या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत पुरुष गटात एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत सातव्या मानांकित भारताच्या करण सिंगने क्वालिफायर व माजी ऑलिंपिकपटू भारताच्या विष्णू वर्धनचा टायब्रेकमध्ये ७-६(६), ६-२ असा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली. हा सामना 1तास 34मिनिटे चालला. पहिल्या सेटमध्ये आघाडीवर असताना विष्णुने सर्व्हिस करताना डबल फॉल्ट केला व याचाच फायदा घेत २१ वर्षीय करणने वर्चस्व राखत विजेतेपद मिळविले.

उझबेकिस्तानच्या अव्वल मानांकित खुमोयुन सुलतानोवने अमेरिकेच्या आधित्य गणेशनचा ३-६, ६-३, ६-४ असा तीन सेटमध्ये संघर्षपूर्ण पराभव करून आपली विजयी मालिका कायम राखली. हा सामना २ तास २५ मिनिटे चालला. पाचव्या मानांकित रशियाच्या बोगदन बोबरोव्ह याने वाईल्ड कार्ड द्वारे प्रवेश केलेल्या भारताच्या नितीन कुमार सिन्हावर ६-३, ६-१ असा विजय मिळवत उपांत्य फेरी गाठली.

दुहेरीत उपांत्य फेरीत दुसऱ्या मानांकित एसडी प्रज्वल देव व आदिल कल्याणपूर या भारतीय जोडीने इंडोनेशियाच्या एम रिफ्की फित्रियादी व कोरियाच्या जंग युनसेओक यांचा ७-५, ६-३ असा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली. दुसऱ्या सामन्यात भारताच्या आर्यन शहाने अमेरिकेच्या आधित्य गणेशन यांनी रशियाच्या अव्वल मानांकित एगोर अगाफोनोव व बोगदन बोबरोव्ह यांचा ७-६(०),६-१ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली.

## स्टॉयनिसने पाकिस्तानला बदडले

# ऑस्ट्रेलियाकडून पाकिस्तानचा'व्हाईट'वॉश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियाने तिसऱ्या ट्वेंटी-२० सामन्यात पाकिस्तानवर ७ विकेट्स व ५२ चेंडू राखून दणदणीत विजय मिळवला. पाकिस्तानचा संपूर्ण संघ ११७ धावांत तंबूत पाठवल्यानंतर ऑस्ट्रेलियाने ११.२ षटकांत ३ बाद ११८ धावा करून विजय मिळवला. मार्कस स्टॉयनिसने२७ चेंडूंत ५ चौकार व ५ षटकारांसह ६१ धावांची वादळी खेळी केली. ऑस्ट्रेलियाचा हा पाकिस्तानविरुद्ध सलग सातवा ट्वेंटी-२० विजय आहे आणि ही सर्वाधिक सलग विजयाची मालिका आहे. न्यूझीलंडने २०२३-२४ या कालावधीत पाकिस्तानला सलग ६ ट्वेंटी-२० सामन्यांत पराभूत केले होते.

प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानचा संपूर्ण संघ १८.१ षटकांत ११७ धावांवर तंबूत परतला. बाबर आझमने सर्वाधिक ४१ धावा केल्या, त्याला हसीबुल्लाह खानने २४ धावांची खेळी करून सहकार्य केले. पण, त्यानंतर पाकिस्तानचे ७ फलंदाज अवघ्या ४७ धावांची भर घालून माघारी परतले. आरोन हार्डीने ३, ॲडम झम्पा व स्पेन्सर जॉन्सन यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.

बाबरने आज विराटचा विक्रम मोडला. आंतरराष्ट्रीय ट्वेंटी-२०त सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये बाबर ४१९० ( १२६ सामने) दुसऱ्या क्रमांकावर आला आहे. त्याने विराट कोहलीचा ४१८८ (१२५ सामने) धावांचा विक्रम मोडला. रोहित शर्मा १५९ सामन्यांत ४२३१ धावांसह अव्वल आहे.

## महाराष्ट्र ओपन कॅरम चॅलेंजर्स ट्रॉफी स्पर्धा मुंबईत रंगणार



**मुंबई :** महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या वतीने दुसऱ्या महाराष्ट्र ओपन कॅरम चॅलेंजर्स करंडक २०२४-२०२५चे आयोजन मुंबईतील महाराष्ट्र राज्य भारत स्काउट हॉल, शिवाजी पार्क, दादर येथे १६ ते १८ डिसेंबर यादरम्यान करण्यात येणार आहे. पुरुष एकेरी व महिला एकेरी अशा दोन विभागात ही स्पर्धा रंगणार असून पुरुष विभागातील पहिल्या ३२, तर महिला विभागातील पहिल्या १६ विजेत्यांना मिळून एकंदर १० लाखांची रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. पुरुष गटातील विजेत्याला रोख रुपये एक लाख ५० हजार, उपविजेत्याला रोख रुपये एक लाख व तिसऱ्या क्रमांकासाठीच्या खेळाडूस रोख रुपये ७५ हजारांचे बक्षीस व ट्रॉफी देण्यात येईल. महिला विभागातील विजेतीला एक लाख, उपविजेतीला ५० हजार व तिसऱ्या क्रमांकासाठीच्या खेळाडूस रोख रुपये ३० हजारांचे बक्षीस व करंडक देऊन गौरवण्यात येणार आहे.


## हर्षित माहीमकरला दुहेरी मुकुटाची संधी



**मुंबई :** हर्षित माहीमकरला महाराष्ट्र राज्य खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत दुहेरी मुकुटाची संधी निर्माण झाली आहे. १७ वर्षांखालील मुले व पुरुष अशा दोन्ही विभागात हर्षितने अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्यामुळे या दोन्ही विभागात त्याच्याकडे अजिंक्यपद पटकावण्याची संधी असणार आहे. महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या मान्यतेने तसेच ग्रेटर मुंबई बॅडमिंटन असोसिएशन व एनएससीआय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र राज्य खुली बॅडमिंटन स्पर्धा सुरू आहे. महालक्ष्मी येथील वेलिंग्डन स्पोर्ट्स क्लब कोर्टवर खेळल्या जात असलेल्या स्पर्धेत हर्षित माहीमकरने कमालीचे सातत्य राखताना पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत दुसऱ्या मानांकित श्वेतांक कर्णिकवर ३४ मिनिटांमध्ये २१-१३, २१-१० असा विजय साकारला.

## मुंबईचा कोच आता आरसीबीमध्ये सामील

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेचा लिलाव आता एका आठवड्यावर येऊन ठेपला आहे. अशाच सर्व फ्रँचायझी तयारीला लागल्या आहेत. दरम्यान, यंदा अनेक संघात मोठे बदल तर घडताना दिसणार आहेत.

फक्त खेळाडूंमध्येच नाही, तर यंदा सपोर्ट स्टफमध्येही बदल दिसले आहेत. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघानेही आयपीएल २०२५ साठी सपोर्ट स्टाफमध्ये बदल केले आहेत. आता त्यांनी मुंबईच्या एका दिग्गजालाही सपोर्ट स्टाफमध्ये सामील केले आहे.

सध्या मुंबईच्या राज्य संघाचे मुख्य प्रशिक्षकपद सांभाळणाऱ्या ओमकार साळवी यांना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने आयपीएल २०२५ साठी वेगवान गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नेमले आहे, अशी माहिती मिळत आहे. साळवी यांना प्रशिक्षण क्षेत्रात चांगला अनुभव आहे. ते सध्या तरी मुंबई संघाला मार्गदर्शन करत आहेत. तसेच त्यांनी यापूर्वी कोलकाता नाईट रायडर्स संघातही सहाय्यक प्रशिक्षक म्हणून काम पाहिले आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनसोबत मुख्य प्रशिक्षक म्हणून साळवी यांचा कार्यकाळ मार्च २०२५ मध्ये संपणार आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईने २०२३-२४ रणजी स्पर्धेचे विजेतेपद मिळवले.

## टेनिस स्पर्धेत डेनिका फर्नांडो, पार्थसारथी मुंढे,

# स्वराज ढमढेरे, नीव कोठारी अंतिम फेरीत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** ओम दळवी मेमोरियल ट्रस्ट यांच्या तर्फे आयोजित व एआयटीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या चौदाव्या ओम दळवी मेमोरियल टी अँड टी इफ्रा लिमिटेड करंडक अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज (१८ वर्षाखालील) टेनिस स्पर्धेत मुलींच्या गटात डेनिका फर्नांडो, पार्थसारथी मुंढे यांनी तर, मुलांच्या गटात स्वराज ढमढेरे, नीव कोठारी या महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

महाराष्ट्र पोलिस(एमटी जिमखाना)टेनिस जिमखाना,परिहार चौक, औध येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत एकेरीत उपांत्य फेरीत मुलांच्या गटात बिगरमानांकित महाराष्ट्राच्या नीव कोठारीने आठव्या मानांकित महाराष्ट्राच्या विश्वजीत सणसचा ४-६, ६-२, ६-४ असा तीन सेटमध्ये संघर्षपूर्ण पराभव करून अंतिम फेरी गाठली. दुसऱ्या उपांत्य फेरीच्या लढतीत तिसऱ्या मानांकित महाराष्ट्राच्या स्वराज ढमढेरेने अव्वल मानांकित महाराष्ट्राच्या ओमकार शिंदेचा ६-२, ५-७, ६-१ असा पराभव करून सनसनाटी निकालासह अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

मुलींच्या गटात उपांत्य फेरीत अव्वल मानांकित महाराष्ट्राच्या डेनिका फर्नांडोने महाराष्ट्राच्या स्वानिका रॉयचा ६-३, ७-५ असा पराभव करून आपली विजयी मालिका कायम ठेवली. दुसऱ्या मानांकित महाराष्ट्राच्या पार्थसारथी मुंढेने कर्नाटकच्या संस्कृती लालचा ६-१, ६-० असा एकतर्फी पराभव करून आगेकूच केली. दुहेरीत मुलांच्या गटात उपांत्य फेरीत अर्जुन किर्तने व नील केळकर या जोडीने दुसऱ्या मानांकित कर्नाटकाच्या अरिहंत कौल व महाराष्ट्राच्या शान वरळीकर यांचा ६-१, ६-३ असा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली.

मुलींच्या गटात उपांत्य फेरीत महाराष्ट्राच्या डेनिका फर्नांडो व पार्थसारथी मुंढे या अव्वल मानांकित जोडीने ध्रुवी आद्यंतया व स्वानिका रॉय यांचा ६-२, ४-६, १०-६ असा तर, अदिती खानापुरी व संस्कृती लाल यांनी तिसऱ्या मानांकित अविशी शर्मा व धन्वी काळे यांचा ४-६, ६-४, १०-७ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला..

## संस्कृती ! भारतीय खेळाडू मॅग्नस कार्लसनच्या पाया पडली



**नवी दिल्ली :** जागतिक क्रमवारीत पहिल्या स्थानावर असलेल्या मॅग्नस कार्लसन याने टाटा स्टील बुद्धिबळ स्पर्धेत दुहेरी यशाला गवसणी घातली. त्याने याआधी जलद बुद्धिबळ स्पर्धेत अजिंक्य होण्याचा मान संपादन केला. आता रविवारी कार्लसनने ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेतही जेतेपदावर नाव कोरले. या स्पर्धेत वूमन FIDE मास्टर ब्रिस्टी मुखर्जीने आपली विजेतेपदाची ट्रॉफी स्वीकारताना वर्ल्ड चॅम्पियन कार्लसेनचा भारतीय संस्कृतीनुसार आशिर्वाद घेतला. मॅग्नस कार्लसन याने अखेरच्या फेरीत भारताच्या विदीत गुजराथी याला पराभूत ट्रॉफी जिंकली. त्याने शेवटच्या तीनही फेऱ्यांमध्ये विजय मिळवला हे विशेष. अखेर १३ गुणांसह ब्लिट्झ प्रकारात जेतेपद पटकावले. वेस्ली सो याने ११.५ गुणांसह दुसरे स्थान पटकावले. त्याने मागील सातपैकी सहा लढतींमध्ये विजय साकारले हे विशेष. भारताचा अर्जुन एरीगेसी तिसऱ्या स्थानावर राहिला. आर. प्रज्ञानंदने चौथे आणि विदीत गुजराथी पाचवे स्थान पटकावले.

# बारामती, हेमराज उपांत्य फेरीत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** बारामती स्ट्रायकर्स, हेमराज मृत्युंजय या संघांनी निलेश भिंताडे स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने आयोजित पुणे जिल्हा टेनिस प्रीमियर एन. बी. ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत आपापल्या प्रतिस्पर्ध्यावर मात करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

वडगाव बुद्रुक येथील सिंहगड रोडवरील मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे. पहिल्या उपांत्य लढतीत बारामती ब्लास्टर्स संघाने शिरसाठ स्पोर्ट्स संघावर आठ गडी राखून मात केली. शिरसाठ संघाला निर्धारित ८ षटकांत ३ बाद ८७ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल बारामती संघाने विजयी लक्ष्य ६.३ षटकांत दोन गडींच्या मोबदल्यात पूर्ण केले. यात सलामीवीर चेतन कलांगेने १८ चेंडूंत पाच चौकार व दोन षटकारांसह नाबाद ४३ धावा केल्या.

दुसऱ्या उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत हेमराज मृत्युंजय संघाने इशिका इलेव्हन संघावर तीन गडी राखून मात केली. इशिका संघाला निर्धारित ८ षटकांत ८ बाद ८८ धावाच करता आल्या. हेमराज मृत्युंजय संघाने विजयी लक्ष्य ७.३ षटकांत सात गडींच्या मोबदल्यात पूर्ण केले.

## स्पेन युरो कपच्या अंतिम फेरीत

**नवी दिल्ली :** स्पेनने तब्बल १२ वर्षांनंतर युरो कपच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. मंगळवारी जर्मनीच्या बर्लिनमधील अलियान्झ एरिना येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या उपांत्य फेरीत फ्रान्सचा २-१ असा पराभव केला. स्पेनच्या विजयाचे नायक दानी ओल्मो आणि १६ वर्षीय लॅमिने यामल होते.

आता अंतिम फेरीत स्पेनचा सामना रविवारी इंग्लंड आणि नेदरलँड्स यांच्यात होणाऱ्या दुसऱ्या उपांत्य लढतीतील विजेत्या संघाशी होईल. याआधी स्पेनने २०१२ मध्ये इटलीला हरवून अंतिम फेरी गाठली होती. स्पेनच्या विजयाचे नायक हे १६ वर्षीय लॅमिने यामल आणि दानी ओल्मो ठरले.

## राजस्थान रॉयल्स अकादमीचा सहज विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** राजस्थान रॉयल्स अकादमी संघाने सांगली जिल्हा क्रिकेट असोसिएशन (एसडीसीए) संघाला ४ गडी राखून पराभूत करताना इकोल स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने घेण्यात आलेल्या इकोल टी-२० करंडक स्पर्धेत आगेकूच केली.

प्रथम फलंदाजी करताना एसडीसीए संघाचा डाव १९.५ षटकांत सर्वबाद १२१ धावांपर्यंत मजल मारली. सोमेश गस्तेने ३४, सुदीप पाठकने ३२ धावांची खेळी केली. यांना तरणजितसिंग धिल्लनने १७ तर अथर्व चांदुरेने १० धावा करताना साथ देण्याचा प्रयत्न केला. राजस्थान संघाकडून केदार बजाजने ३, रवींद्र जाधव व निमीर जोशी यांनी प्रत्येकी २ तर, साव्या गजराज व ओंकार राजपूत यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.


## ऑस्ट्रेलियन फिरकीपटूची कोरी रोचिचिओलीची हॅटट्रिक




**नवी दिल्ली :** ऑस्टेलियाचा फिरकीपटू कोरी रोचिचिओली याने शेफील्ड शिल्ड क्रिकेट स्पर्धेमध्ये दोन डावांत मिळून एक हॅटट्रिक पूर्ण केली. वेस्टर्न ऑस्ट्रेलिया संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कोरीने व्हिक्टोरियाविरुद्ध तीन चेंडूंत तीन विकेट्स घेतल्या, परंतु हे तीन चेंडू त्याने दोन वेगवेगळ्या डावांत टाकले. वेस्टर्न ऑस्ट्रेलियाच्या कोरीने पहिल्या डावात पीटर सिडलला बाद करून व्हिक्टोरीयाचा पहिला डाव गुंडाळला. त्यानंतर दुसऱ्या डावात त्याने ॲश्ली चंद्रासिंघे व कॅम्बेल केलावे यांच्या विकेट्स घेऊन हॅटट्रिक पूर्ण केली. त्यामुळे व्हिक्टोरीयाला १९ धावांत दोन धक्के बसले. दोन डावांतील वेस्टर्न ऑस्ट्रेलियासाठी अशी हॅटट्रिक घेणारा तो दुसरा गोलंदाज ठरला. यापूर्वी ब्रॉडी काऊचने तस्मेनियाविरुद्ध अशी हॅटट्रिक घेतली होती. वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव १६७ धावांवर गडगडला.व्हिक्टोरियाच्या टॉड मर्फी ( ४-३७), फर्गूस ओनेल ( ३-४३) व झेव्हियर क्रोन ( २-२०) यांनी चांगला मारा केला.

# पंतसारखाच आणखी एका क्रिकेटपटूचा भीषण अपघात ; गाडीचा झाला चुराडा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय संघाचा स्टार खेळाडू ऋषभ पंत याच्या अपघाताची बातमी आजही अनेक चाहत्यांच्या मनात धडकी भरते. नव वर्षाचं सेलिब्रेशन कुटुंबियांसोबत करण्यासाठी ऋषभ स्वतः गाडी चालवत घराच्या दिशेने निघाला होता, परंतु त्याच्या गाडीचा भीषण अपघात झाला आणि ऋषभला जवळपास वर्ष-दीड वर्ष क्रिकेटपासून दूर रहावे लागले. या अपघातातून सावरत ऋषभने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दमदार पुनरागमन केले आहे. पण, अपघाताचा तो दिवस चाहत्यांना आजही घाबरवून टाकतो.

ऋषभप्रमाणेच वेस्ट इंडिजचा फलंदाज एनक्रुमाह बोन्नेर याच्या गाडीचा भीषण अपघात सोमवारी पहाटे २ वाजता झाला. त्याने त्याच्या इंस्टाग्राम स्टोरीवर चक्काचूर झालेल्या गाडीचा फोटो पोस्ट करून याची माहिती दिली. सुदैवाने या अपघातात तो वाचला आणि त्याने देवाचे आभार मानले. त्याने पोस्ट केलेल्या फोटोत गाडीचा पुढचा भाग पूर्णपणे चक्काचूर झाल्याचे दिसत आहे.

बोन्नेर हा वेस्ट इंडिज संघातील मधल्या फळीत फलंदाजी करतो आणि लेग स्पिन गोलंदाजी करतो. २०११ मध्ये त्याने ट्वेंटी-२० क्रिकेटमध्ये पदार्पण केले, परंतु त्याला मिळालेल्या संधीचं सोनं करता आलं नाही. त्यानंतर पुढची १० वर्ष तो जमैका येथे देशांतर्गत क्रिकेट खेळला. २०२० मध्ये इंग्लंडविरुद्धच्या कसोटी संघात त्याचे वेस्ट इंडिजच्या संघात पुनरागमन झाले.

## मायदेशात सलग सहाव्या मालिकेत फडकावली विजयी पताका

# जयसूर्याच्या मार्गदर्शनात श्रीलंकेचा विजयरथ सुसाट!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** पल्लेकेले येथील पीएलए स्टेडियमवर पावसाने प्रभावित झालेल्या सामन्यात न्यूझीलंडचा तीन गडी राखून पराभव करून ३ सामन्यांच्या वनडे मालिकेत श्रीलंकेने २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. कमी धावसंख्येच्या सामन्यात, कुसल मेंडिसने बॅटने आश्चर्यकारक कामगिरी केली आणि संघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अशा प्रकारे श्रीलंका संघाचा विजयरथ सनथ जयसूर्याच्या कोचिंगखाली काही महिन्यांपासून सुसाट धावताना दिसत आहे.

श्रीलंकेने मायदेशात सलग सहावी द्विपक्षीय वनडे मालिका जिंकली आहे.. जुलै २०२१ मध्ये भारताकडून पराभूत झाल्यापासून ते मायदेशात सलग १० मालिकेत अपराजित आहेत. या वर्षी, श्रीलंकेने पाच द्विपक्षीय एकदिवसीय मालिका जिंकल्या आहेत, जे केवळ याआधी २०१४ मध्येच साध्य करता आले होते. त्याचबरोबर श्रीलंकेने नो नोव्हेंबर २०१२ पासून न्यूझीलंडविरुद्ध पहिलीच मालिका जिंकली आहे. सनथ जयसूर्याच्या प्रशिक्षणाखाली संघ पूर्णपणे बदलला आहे आणि जुन्या फॉर्ममध्ये परतला आहे.

श्रीलंका आणि न्यूझीलंड यांच्यात खेळल्या गेलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात पावसाचा परिणाम दिसून आला. त्यामुळे सामना ४७-४७ षटकांचा करण्यात आला. या सामन्यात श्रीलंकेच्या कर्णधाराने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. किवी संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला आणि ४५.१ षटकांत २०९ धावांवर गारद झाला. आता श्रीलंकेला ४७ षटकांत २१० धावांचे लक्ष्य गाठायचे होते, जे त्यांच्या संघाने ४६ षटकांत म्हणजे एक षटक आणि ३ गडी राखून २१० धावा केल्या आणि सामना सहज जिंकला. श्रीलंकेच्या विजयात कुशल मेंडिसची भूमिका महत्त्वाची होती.